MAHMAR/19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष अकरावे/अंक ४/मार्च २०१०

## संपादकीय

## जया अंगी मोठेपणा ...

१४ मार्च २०१० रोजी मराठीतील एका दिग्गज कवीचे निधन झाले. त्यांचे वय ९३ वर्षे होते, या पार्श्वभूमीवर काही अघटित घडले असे म्हणता येणार नाही. विंदांसारख्या समाजमान्य व्यक्ती शरीररुपाने समाजातून जात असल्या तरी त्यांच्या शाश्वत चिंतनामुळे त्यांना एक प्रकारे अमरत्व प्राप्त झालेले असते. म्हणूनच विंदांसारख्या व्यक्तींच्या बाबतीत लिहिताना व्यक्ती म्हणून विंदा व कवी म्हणून विंदा सोयीचे असले तरी, वेगळे करणे हितावह नसते. कविता म्हणजे यमक जुळवलेले केवळ शाब्दिक बुडबुडे नसतात. अशा कविता मिनिटागणिक प्रसृत होतात. परंतु विंदांसारख्यांच्या कविता या त्यांतील आशयामुळे जास्त गांभीर्याने घेतल्या जातात.

सर्वसाधारणपणे हा आशयही प्रत्येक कवी आपल्या शैलीनुसार मांडत असतो आणि मानवी जीवनातील अतिशय महत्त्वाच्या कंगोऱ्यांना तो स्पर्श करतो. 'जीवन म्हणजे काय' यापासून ते 'ते जगावे कसे' इथपर्यंतच्या सर्व विषयांना त्याने हात घातलेला असतो. आणि म्हणूनच ''एक तुतारी द्या मज आणुनि। फुंकीन जी मी स्वप्राणाने।।'' या कृष्णाजी केशव दामले उर्फ केशवसुतांपासून ''देणाराने देत जावे'' या विंदांच्या कवितेपर्यंत कोठे तरी एक परिवर्तन जीवनाचा अर्थ शोधण्याचा किंवा कवीला अपेक्षित असल्याप्रमाणे देण्याचा प्रयत्न दिसून येतो.

परंतु एवढे काव्य प्रसृत होऊनही समाजाची आजची स्थिती, ही कालची बरी होती असे म्हणण्यासारखी होत आहे. नीती, नियम, सामाजिक बंधने या सर्वांना पायदळी तुडवून बेदरकार स्वच्छंदी, बेजबाबदार जीवन हाच सामाजिक नेतृत्वाचा मूलमंत्र झालेला दिसतो. 'उक्ती' व 'कृती' यांतील दरी क्षणोक्षणी वाढताना दिसते. येथे महत्त्वाचा प्रश्न असा आहे की इतक्या कविता आणि लेखन होऊनही समाज बदलत नाही. या अपयशालाही हे विचारवंतच जबाबदार आहेत का?

केशवसुत, विंदांसारख्या किंवा बापटांसारख्या कवींना त्यांच्या कवितेच्या माध्यमातून, आशयातून एक आदर्श नायक म्हणून मान्यता मिळते आणि खरी गोम येथेच येते. या सर्व आदरणीय व्यक्तींचा आदर राखून हे म्हणवेसे वाटते की, समाजातील सामान्य माणसाला पडणारी प्रलोभने की, ज्यामुळे त्याचे स्खलन होते त्या सर्व प्रलोभनांना या महान व्यक्तीही भुलतात. ''लोका सांगे ब्रह्मज्ञान। आपण कोरडे पाषाण।।'' अशी येथे परिस्थिती दिसून येते. संयम, सहिष्णुता,

(कव्हर नं. २ वर)

मुखपृष्ठावरून

**संपादकीय**

**जया अंगी मोठेपणा ...**

क्षमाशीलता ही मूल्ये कुठल्याही सामाजिक नेतृत्वाच्या अंगी असावीत अशी किमान अपेक्षा असते. विंदांच्या पत्नीची साक्ष देऊन हे म्हणता येईल की, विंदा स्वत: हेकेखोर, रागीट, हटवादी होते. १९८० च्या सुमारास त्यांनी जगात आता नवीन उरले नाही म्हणून जवळ जवळ लेखन संन्यास घेतल्याचे सांगितले जाते. जगात प्रत्येक क्षणाला बदल घडत असतो व तो टिपायला सृजनशीलता लागते. कदाचित विंदांमधील कवी थकला असेल; पण जगात काही नवीन घडत नाही असे म्हणणे आपल्या आटलेल्या प्रतिभेची दिलेली कबुली असते.

विंदाच काय पण त्या पठडीतले सर्वच कवी आणि लेखक ''विज्ञानवादी'' असावे लागतात. बहुतेक वेळा हे विज्ञान म्हणजे, जडवाद, म्हणजेच नास्तिकवादाशी सोयरीक असते. त्याच्या विज्ञानाशी सुतराम संबंध नसतो. कारण मानवी जीवनात अमूलाग्र बदल घडवणारे न्यूटनपासून रामानुजनपर्यंत सर्व वैज्ञानिक हे ठार अस्तिक होते.

विंदा वैयक्तिक जीवनात शंकराचार्यांच्या स्तोत्रांपासून गायत्री मंत्रापर्यंत सर्व पठण आंघोळीच्या वेळी व नंतर करत असत. एवढेच नाही तर आपल्या नातवांकडूनही त्यांनी ते पाठ करवून घेतले होते. कदाचित जिभेला वळण लागण्यासाठी त्याचा उपयोग त्यांनी केला असेल, पण कोठेही समाजातील तळागाळातील पीडित व दलित बांधवांना मात्र 'माझ्या कविता वाचा अगर वाचू नका, पण स्तोत्रे म्हणून आपली वाचा शुद्ध करा' असे सांगितल्याचे त्यांच्या लेखनात आढळत नाही. कदाचित 'ब्रह्मणी' शिक्का आपल्यावर बसेल किंवा आपल्याला 'परंपरा' वादी म्हणून शिक्का बसेल ही भिती त्यांना वाटली असावी!

चारित्र्य म्हणजे प्रतिभा नाही, ते सतीचे वाण असते व व्यक्ती जेव्हा समाजाच्या नेतृत्वपदापर्यंत पोहोचते तेव्हा तिने स्वत:वर अधिकच बंधने घालून चारित्र्याकरता किमान आवश्यक असलेल्या गोष्टींचे पालन करणे आवश्यक असते. दारूमुळे समाज भग्न उध्वस्त कसा होतो हे सांगण्याची गरज नाही. अनेक लेखक कलावंतांनी यामुळे स्वत:बरोबर कुटुंबाची धुळधाण केल्याचेही आपण जाणतो. म्हणूनच 'आदर्श' ही बिरुदावली मिळालेल्या सर्वच सामाजिक, साहित्यिक नेतृत्वाने या प्रलोभानांपासून मुक्त राहणे हे त्यांचे आदी कर्तव्य आहे. हे किती कठीण आहे, हे त्यांना कळते तेव्हाच त्याची प्रभावीपणे मांडणी करता येते.

विंदा हे स्वत: मद्यपान करायचे आणि त्यांच्या पत्नीने मात्र घरात मद्यपान करायचे नाही असे बंधन घातल्यामुळे घरात मद्यपान करणे बंद केल्याचे त्यांनी लिहून ठेवले आहे. 'प्रत्येक माणसाचे पाय मातीचे असतात' 'पुराणातील वांगी पुराणात' अशा म्हणी उगाच रूढ होत नाहीत. दुर्दैवाने आज निदान गेली काही दशके, शतके ज्ञानपीठापासून गावभूषणांपर्यंतच्या पदव्यांची पाखड होऊनही वर सांगितल्याप्रमाणे समाजाचे स्खलन चालूच आहे.

आणि म्हणूनच दुर्दैवाने असे म्हणावेसे वाटते की, 'नव' समाजनिर्मिती करता प्रतिभेपेक्षा स्वत:वर 'अंकुश' ठेवणाऱ्या 'बोले जैसा चाले' हा मंत्र अंगिकारलेल्या व्यक्ती समाजाला हव्यात. हे ज्या दिवशी समाजाला उमगेल त्यावेळी त्यास नवीन दिशा मिळेल. नाहीतर पुण्यतिथ्या, जयंत्यांच्या दिवशी प्रतिभावंतांची भाषणे देणे आणि छापणे हेच घडत राहील.

●●●




**वर्ष अकरावे / अंक ४ / मार्च २०१०**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे / अंक ९ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | व्यवस्थापनशास्त्रातील विचारवंत (पूर्वार्ध) | प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये | ३ |
| २) | निसर्गरम्य केळवे | प्रा. अशोक रामचंद्र ठाकूर | ७ |
| ३) | शिवापराधक्षमापनस्तोत्रम् | नीलकण्ठसुत | १० |
| ४) | कन्यादान | श्री. यशवंत माने | १२ |
| ५) | उपनिषदातील विचार (लेखांक ४ था) | श्री. शं. बा. मठ | १५ |
| ६) | भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १९ |
| ७) | आदरांजली | श्री. सुरेंद्र लागू | २८ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने **'दिशा'** हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) **''विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा''** या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/–**

अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/– फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# व्यवस्थापनशास्त्रातील विचारवंत
# (पूर्वार्ध)

*व्यवस्थापनशास्त्राच्या विकासातील अनेक विचारवंतांचे योगदान हा महत्त्वाचा विषय आहे. त्या दृष्टीने एका लेखाच्या मर्यादेत काही विचारवंतांच्या योगदानाचा निर्देश या लेखात आला आहे – संपादक*

**प्रस्तावना :**

व्यवस्थापन हे एक शास्त्र, तसेच एक कला आहे. ते अन्य भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र इत्यादी शास्त्रांप्रमाणे नैसर्गिक सिद्धांतांवर आधारलेले चौकटबद्ध शास्त्र नसून शतकानुशतकांच्या अनुभवांवर आधारलेले आहे. ते वरवर ढोबळ वाटणाऱ्या पण, अंतिमत: सखोल परिणाम साधणाऱ्या तत्त्वांनी बनलेले आहे.

उद्दिष्टे साध्य करण्यास केलेले प्रयोग जसजसे यशस्वी होऊ लागले तसतसे त्यास सिद्धांताचे स्वरूप येऊ लागले. उत्पादन क्षेत्रात या सिद्धांतांचे प्रथम उपयोजन करण्यात आले. परंतु, नंतर इतरही क्षेत्रांत यांचा प्रभावी वापर करण्यात आला. त्यातूनच व्यवस्थापन शास्त्राचा उदय झाला.

व्यवस्थापनशास्त्राला पुरातन परंपरा आहे. इ. स. पूर्व २९०० वर्षांपूर्वी व्यवस्थापनशास्त्रातील एक उदाहरण इजिप्तमध्ये सापडते. तिथे एक लाखाच्या वर मजूर जवळ जवळ २० वर्षे पिरॅमिडच्या बांधकामावर सुनियोजित पद्धतीने काम करीत होते.

तसेच, सुप्रसिद्ध चीनची भिंत, मध्य अमेरिकेतील वास्तू, पर्शियन रस्ते अशा काही अतिभव्य कामांपाठी देखील व्यवस्थापनशास्त्र असल्याचे पुरावे आपल्याला सापडतात.

देवाची भीती, शिक्षेची भीती या प्रकारच्या पद्धतींनी आपले कार्य शासक करवून घेत असल्याचीही उदाहरणे आहेत.

१६ व्या शतकात मेकाव्हिले (Machiavelli) याने आपल्या The Prince या ग्रंथात इटालियन शहराच्या शासकांसाठी राज्यव्यवस्थेची काही तत्त्वे सांगितली आहेत, ज्यात व्यवस्थापनशास्त्राची बीजे आढळतात.

औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनाचे प्रमाण वाढले. तशी कारखाना व उद्योगधंदे यांच्यात वाढ झाली. नफ्याचे गणित साधण्यासाठी काही निराळ्या तत्त्वांची व व्यवस्थेची गरज निर्माण झाली. त्यासाठी निरनिराळे प्रयोग केले गेले. त्यातूनच व्यवस्थापनशास्त्र व त्याच्या निरनिराळ्या पद्धती विकसित होत गेल्या.

वेगवेगळ्या प्रयोगांनंतर वेगवेगळ्या तत्त्वप्रणाली अस्तित्वात आल्या. त्यांनी आधुनिक व्यवस्थापनशास्त्रात मोलाची भर घातली. त्या प्रमुख तत्त्वप्रणाली व त्यांचे उद्गाते असे आहेत –

१) फ्रेड्रिक टेलर : शास्त्रीय व्यवस्थापन

२) हेन्री फेयॉल : प्रशासकीय

३) एल्टन मेयो : वर्तणूकवादी दृष्टिकोन

४) चेस्टर बर्नार्ड : सामाजिक व्यवस्थापन

५) पीटर ड्रकर : आधुनिक व्यवस्थापन

या सर्वांचा आता परिचय करून घेऊ.

**१) फ्रेड्रिक विंस्लो टेलर (Frederick Winslow Taylor) (१८५६ – १९१५) :**

फ्रेड्रिक टेलर याला शास्त्रीय व्यवस्थापनाचा जनक

मानतात. The Midvale Steel Co. या कंपनीत कामगार म्हणून कामास लागलेला फ्रेड्रिक आपल्या हुशारीने उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी शास्त्रीय दृष्टिकोन बाळगण्यावर व शास्त्रीय पद्धतीने आचरण करण्यावर जोर दिला. त्याची तत्त्वे अशी होती.

१) अंदाजपंचे कोणतीही गोष्ट करू नये.

२) उत्पादनाचा वेगवेगळ्या गटातील सुसंगतीचा उपयोग करा.

३) व्यक्तिनिष्ठ विचाराऐवजी सहकाराची भावना रूजवा.

४) जास्तीत जास्त उद्दिष्टे गाठण्याचा प्रयत्न करा.

५) कर्मचाऱ्यांचा विकास घडवायला हवा.

यात संस्थेबरोबरच कामगारांच्या हिताचाही विचार केलेला दिसून येतो. उत्पादकता वाढवायची म्हणजे त्यासाठी आवश्यक असलेल्या कामाचे शास्त्रीय पद्धतीने विश्लेषण करून त्यातील एकेक भाग प्रत्येकावर सोपवणे आवश्यक आहे. तसेच कामगार ते काम कमीत कमी वेळ व श्रम वापरून कसे पार पाडील याची आखणी करायला हवी. या विचारांना 'शास्त्रीय विचार प्रणाली' म्हणतात. ही फ्रेड्रिक टेलरची देणगी आहे.

कामगारांचा अभ्यास करताना काही गोष्टी फ्रेड्रिकच्या लक्षात आल्या. त्या अशा – कामगारांना अशी भीती वाटत होती की त्यांनी त्यांची उत्पादकता वाढवली, तर दुसऱ्या कामगारांना काम घालवावे लागेल. व्यवस्थापनाची दोषपूर्ण वेतन व्यवस्था त्यांना हळू व कमी उत्पादन निर्मितीसाठी भाग पाडी. पूर्वापार चालत आलेल्या कामाच्या पद्धती नव्या उत्पादन क्षेत्रात कालबाह्य ठरल्याने त्यातून टाकावू कचराच जास्त निर्माण होई.

यावर विचार करताना फ्रेड्रिकच्या असे लक्षात आले की आता नव्या पद्धतीच्या उत्पादन निर्मितीची गरज आहे. कामगारांना प्रशिक्षणाची, तसेच विशिष्ट उत्पादन करण्यासाठी तयारीची गरज आहे. विशिष्ट उत्पादनाचा वेग ठरावीक राहण्यासाठी मुळात कारखान्यातील मालक व कामगार यांच्यात सुसंवाद असायला हवा.

फ्रेड्रिकच्या विचारांचे प्रतिबिंब त्याने लिहिलेल्या 'The Principles of Scientific Management' या ग्रंथात पडलेले आढळून येते. त्याचे विचार, त्याचे प्रयोग, त्याने सुचवलेल्या काही पद्धती त्यात मांडल्या आहेत.

१. *Price Rate Incentive System* : ही एक पद्धत फ्रेड्रिक याने सुचवली होती. त्यात त्याने म्हटल्याप्रमाणे जो कामगार उत्पादनाची विशिष्ट उंची गाठतो, त्याला किमान असे वेतन मिळायलाच हवे. त्यापुढे तो जितके उत्पादन करतो, त्याच्या प्रमाणात त्याला अधिक आर्थिक फायदा व्हायला हवा. व्यवस्थापनानेही वेतन व्यवस्था अशी आकर्षक ठेवायला हवी, की कामगार जास्तीत जास्त काम करायला उद्युक्त झाला पाहिजे.

२. *Time and Motion Study* : या पद्धतीत सुचवल्याप्रमाणे सुरुवातीला कामाची विविध लहान भागांत (Motion) विभागणी केली जाते. कामाचा अनावश्यक भाग दूर केला जातो व ते काम करण्याचा उत्तम मार्ग शोधला जातो. त्यानंतर त्या भागांचा अभ्यास केला जातो व त्या भागांच्या पूर्णत्वानंतर दिवसाला किती उत्पादन प्राप्त होईल हे शोधले जाते. याचा कोणतेही काम सोपे, सहज व जास्त क्षमतेने पूर्ण करण्यासाठी उपयोग होतो.

फ्रेड्रिक टेलरने तेव्हा नव्याने मांडलेले विचार आज मोठमोठ्या उद्योग व्यवसायांतून, कारखान्यांतून मोठ्या प्रमाणावर वापरले जात आहेत. यातच त्याचे द्रष्टेपण दिसून येते.

### २) हेन्री फेयॉल (Henry Fayol) (१८४१–१९२५) :

हेन्री फेयॉल फ्रेंच उद्योगपती होता. त्याचा असा विश्वास होता की शास्त्रीय बैठक व योग्य पद्धतीचा वापर कारखान्यात केला, तर अपेक्षित लक्ष्य सहज साध्य होते.

हेन्रीने औद्योगिक प्रकल्पातील उलाढालीचे तांत्रिक, व्यापारविषयक, आर्थिक, सुरक्षा, हिशेब व व्यवस्थापन असे सहा गट केले. त्याच्या मते पहिल्या पाच बाबींकडे उद्योजक लक्ष देतात. सहावी बाब मात्र दुर्लक्षित करतात. त्यामुळे पहिल्या पाच बाबींवर परिणाम होतो व अपेक्षित लक्ष्य गाठता येत नाही.

त्यासाठी फेयॉलने व्यवस्थापनाची १४ तत्त्वे उद्घोषित केली. त्यांचा उपयोग केल्यास फायदा होतो, हे त्याने दाखवून दिले. ही १४ तत्त्व अशी – Division of Labour, Authority and Responsibility, Discipline, Unity of Command, Unity of Direction, Subordination of individual to organizational interest, Remuneration, Distribution of Authority, Scalar Chain, Order, Equity, Stability of Tenure, Initiative, Esprit de corps.

हेन्री फेयॉलच्या व्यवस्थापनाची मूलतत्त्वे म्हणजे व्यवस्थापनाची पाच कार्ये होत. ही कार्ये म्हणजे Planning, Organization, Staffing, Leading व Controlling.

ही तत्त्वे औद्योगिक व्यवस्थापनातच नव्हेत, तर राजकीय, आर्थिक, सैन्यदल इत्यादींसाठीही लागू होतात.

त्याचे सर्व विचार फ्रेंच भाषेतील त्याच्या व्यवस्थापकीय ग्रंथात त्याने मांडले. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की बाहेरच्या जगाला, विशेषत: अमेरिकेलाही बऱ्याच काळापर्यंत त्यांची ओळख नव्हती त्याचा ग्रंथ जेव्हा इंग्रजीत ‘General And Industrial Management’ या नावाने इ.स. १९४९ मध्ये प्रसिद्ध झाला, तेव्हा त्याची ओळख जगाला झाली.

आपल्या तत्त्वांना लाभलेले यश पाहायला मात्र हेन्री फेयॉल तेव्हा हयात नव्हता.

### ३) एल्टन मेयो (Elton Mayo) (१८८०–१९४९):

मानवी व्यवहार व्यवस्थापनाचा प्रणेता (Human Behaviour Approach) म्हणून एल्टन मेयो याचे नाव घेतले जाते.

आपले सहकारी F.J. Roethlisberger व William J. Dickson यांच्यासह त्याने अमेरिकेतील हॉथॉर्न येथील वेस्टर्न इलेक्ट्रिक कंपनीच्या कारखान्यात १९२७–१९३२ या काळात काही प्रयोग केले. त्याचे निकष हे व्यवस्थापनशास्त्रात आजही प्रभावी म्हणून ओळखले जातात. हे प्रयोग कामगारांचा स्वभाव व मानसशास्त्रीय प्रतिक्रिया यांबाबत केले गेले.

मेयो व त्यांच्या सहकाऱ्यांनी संशोधन करून पुढे असे सिद्ध केले की प्रकाश योजनेतील फेरफार, सुट्टीच्या काळातील फेरबदल, कामाचे तास कमी करणे किंवा विविध प्रकारची प्रलोभने यांचा उत्पादकतेवर काहीही परिणाम होत नाही. तर नीतीधैर्य (Morale), कारखान्याविषयीची ममत्व भावना व उत्तम व्यवस्थापन हे उत्पादकता वाढविण्यास कारणीभूत ठरतात. हीच गोष्ट अगदी शास्त्रीय व्यवस्थापनाच्या प्रणेत्यापासून ते हॉथॉर्न प्रयोगापर्यंत महत्त्वाची म्हणून गणली गेली आहे.

### ४) चेस्टर इ. बर्नार्ड (Chester I. Barnard) (१८६६–१९६१) :

सामाजिक व्यवस्थापन (Sociological Aspect of Management) या पद्धतीचा व सहकार्याची पद्धती आपल्या आस्थापनांत रुजवावी, तसेच संस्थेत संदेश वहन (communication) दर्जेदार असावं, या तत्त्वांचा तो आग्रही होता.

कोणत्याही व्यक्तीवर अथवा संस्थेवर बाह्य समाजातील घटकांचा परिणाम होतो, हे त्याने सिद्ध केले होते. व्यवस्थापकाने व्यापक सामाजिक चौकटीत काम केले पाहिजे व आपल्या संस्थेत सदैव सहकाराची भावना राखली गेली पाहिजे, असे त्याचे मत होते.

आपली ही मते त्याने इ.स. १९३८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या आपल्या Functions of Executives या ग्रंथात मांडली आहेत.

**५) पीटर ड्रूकर (Peter Drucker) (१९०९–२००५) :**

याचा जन्म व्हिएन्ना (Vienna) येथे झाला. शिक्षण ऑस्ट्रिया व इंग्लंडमध्ये झाले. इ.स. १९२९ मध्ये लंडनमधील एका आंतरराष्ट्रीय बँकेत तो अर्थतज्ज्ञ म्हणून कामास लागला. इ. स. १९३९ मध्ये त्याने अमेरिकेस प्रयाण केले. विमा संस्था व ब्रिटीश बँकांसाठी अर्थतज्ज्ञ म्हणून तिथे त्याने सुरुवातीला काम केले. नंतर देशातील बड्या बड्या कंपन्यांसाठी त्याने व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम केले. इ.स. १९४२ ते १९४९ तो तत्त्वज्ञान व राज्यशास्त्र यांचा बेनिंग्टन (Bennington) या महाविद्यालयात प्राध्यापक होता. पुढे १९५० ते १९७२ या कालावधीत त्याने न्यूयॉर्क विद्यापीठात व्यवस्थापन विषयात प्राध्यापक म्हणून विद्यादान केले. नंतर, शेवटपर्यंत कॅलिफोर्निया येथील क्लेरमाँट (Claremont Graduate School) ग्रॅज्यूएट स्कूलमध्ये सामाजिकशास्त्र विषयाचे अध्यापन केले.

पीटर व्यवस्थापनशास्त्रातला विचारवंत होता. लेखक होता. व्यवस्थापनशास्त्रातील विविध पैलूंवर त्याने भरपूर वैचारिक लेखन केले आहे.

पीटर याच्या मते, व्यवसाय सांभाळणे हा काही प्रशासनाचा, पद्धती निर्मितीचा विषय होऊ शकत नाही. व्यवस्थापकाने नेहमी बदल घडवला पाहिजे.

पीटर यांचा दृष्टिकोन कामगार व व्यवस्थापन यांच्या बाबतीत नेहमी समान राहिला आहे. कारण, आपली प्रगती करून घेतली पाहिजे, हेच कामगाराचे व आस्थापनाचे समान उद्दिष्ट असते. उद्दिष्टांवर आधारलेले व्यवस्थापन हे दोघांच्या प्रगतीस हातभार लावते, असे त्यांनी प्रतिपादले. Management by Objectives या वेगळ्या तंत्राची निर्मिती त्याने केली. The New Society, The effective executive, The practice of Management, Big Business, Landmark of Tomorrow, Managing for results, The age of Discontinuity इत्यादी पुस्तकांतून त्याने आपले विचार व्यक्त केले आहेत.

या विचारवंतांनी आपल्या वैचारिक सामर्थ्याच्या जोरावर नवीन विचारधारा निर्माण केल्या. त्यांना त्यांच्या सहकाऱ्यांनी, अनुयायांनी मोलाची साथ दिली. अन्यही काही विचारवंतांनी आपापल्या परीने, स्वतंत्रपणे व्यवस्थापनशास्त्रात भर घातली.

त्या सर्वांचाच या ठिकाणी वैचारिक परामर्श घेणे, उचित ठरेल.

**६) अ‍ॅडम स्मिथ (Adam Smith) (१७२३–१७९०) :**

अ‍ॅडम स्मिथ याला राजकीय अर्थशास्त्राचा जनक मानतात. शिवाय, याने व्यवस्थापनशास्त्रात विपुल लेखन केले आहे.

इ.स. १७७६ मध्ये त्याचा An enquiry in to the nature and causes of the wealth of nations हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्यात त्याने असे प्रतिपादन केले आहे की श्रमविभागणीमुळे उत्पादकता वाढण्यास मदत होते, कामगारांचे कौशल्य वाढते, वेळ वाचतो, शिवाय यंत्रांचा पुरेपूर उपयोग होतो.

(पान क्र. ११ वर)

# निसर्गरम्य केळवे

ठाणे जिल्ह्यातील अनेक पर्यटन स्थळांपैकी पालघर तालुक्यातील केळवे हे निसर्गरम्य गाव मोठे आकर्षक आहे. केळव्याचा परिचय करून देणारा हा लेख - *संपादक*

पश्चिम रेल्वेच्या पालघर स्थानकापासून सुमारे बारा किलोमीटरवर व केळवे रोड स्थानकापासून अवघ्या पाच किलोमीटर अंतरावर केळवे हे ऐतिहासिक व पौराणिक वारसा लाभलेले निसर्गरम्य गाव वसले आहे. एस्.टी.च्या गाडीने गावात प्रवेश करताच रस्त्याच्या दुतर्फा पसरलेल्या नारळी-पोफळीच्या, केळी-पानवेलीच्या लांबच लांब बागा दृष्टीस पडतात. ताडा-माडाचे वृक्ष पित्याचे प्रेमळ छत्र त्याच्यावर ठेऊन मायेची सतत पखरण करीत असतात. दृश्य मोठे मनोहर आणि विलोभनीय दिसते. रस्ता शांत, शीतल आणि आल्हादकारक आहे. वृक्षराजी नतमस्तक होऊन केळव्यात येणाऱ्या पाहुण्यांच्या स्वागतास सज्ज असल्याचे भासते.

केळवे हे पूर्वी प्रसिद्ध बंदर होते. या बंदरातून गुजराथ, काठेवाड या भागाशी व्यापार उदीम चालत असे. मोठमोठ्या पडावातून या भागात उत्पादित होणारी केळी, ऊस, आले इत्यादी बागायती उत्पादने निर्यात होत असत व किराणा माल, पेंड यांची आवक होत असे. बंदर खोल असल्याने मोठमोठी जहाजे या बंदरातून ये-जा करीत असत. त्यामुळे आरमारीदृष्ट्या या बंदराला फार महत्त्व त्याकाळी होते. याची साक्ष एक जलदुर्ग व दोन भुईकोट किल्ले देतात. केळव्याचा किनारा जवळ-जवळ दोन किलोमीटर पसरलेला आहे. किनाऱ्यावरील सुरुची नयनरम्य बाग अतिशय सुरेख आणि रमणीय आहे. किनारा स्वच्छ व विस्तीर्ण असून किनाऱ्यावरील सोनेरी वाळू नेहमीच मोहवत असते. कुटुंबासमवेत अथवा मित्र मैत्रिणींच्या समवेत सुखदु:खाच्या गुजगोष्टी करीत असताना येथे दिवस कधी मावळतो तेच लक्षात येत नाही. त्यामुळे एक दिवसाच्या पिकनिकसाठी केळवे हे मुंबईकरांचे एक आवडते पर्यटन स्थळ होऊन बसले आहे. या गावात सर्व सोयींनी सुसज्ज अशी चार रिसॉर्टस आहेत. तर मध्यम प्रतीची छोटी छोटी सहा सात रिसॉर्टस् आहेत. जेवण, नाश्ता, चहापान व राहण्याची सोय उत्तम तऱ्हेने केली जात असून काहींना एमटीडीसीची मान्यताही मिळालेली आहे.

अशा या प्रसन्न गावात पुराण प्रसिद्ध श्री शितलादेवीचे जागृत देवस्थान आहे. दरवर्षी येथे चैत्र शुद्ध पौर्णिमेस मोठी यात्रा भरते. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नाशिक, सातारा वगैरे शहरांतून देवीचे हजारो भक्तगण देवीच्या दर्शनास येतात. देवीचा चेहरा अतिशय शांत असून तेजस्वी आहे. ती भक्तांच्या संसारात सतत सौख्याची शीतल छाया पसरवीत असते म्हणून तिला शितलादेवी म्हणतात. देवी, गोवर, कांजण्या इत्यादींवर गुण यावा म्हणून अनेक श्रद्धावान भक्तगण या देवीला नवस बोलतात. देवीच्या देवालयाजवळ बगलवाडी म्हणून भाग आहे. पूर्वी देवी गुप्तरूपाने या भाागत राहत होती पुढे तिने दृष्टांत दिला व नंतर गोपाळ पंथियांनी देवालय बांधले अशी कथा आहे. त्यानंतर सतराव्या शतकात ग्वाल्हेर संस्थानाच्या महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला. पूजा अर्चा व देवस्थानाची व्यवस्था यांसाठी वर्षासन व वतन यांनी व्यवस्था करण्यात आली होती. पेशव्यांच्या नावे ही सनद देण्यात आली होती. सध्याचे देवीचे सुंदर मंदिर देवीचे परमभक्त व तत्कालीन महसूलमंत्री

आदरणीय नामदार भाऊसाहेब वर्तक यांच्या मार्गदर्शनाखाली केळवे गावातील सुजाण नागरिकांनी दानशूर भाविकांच्या उदार व भरघोस देणग्यांतून जवळ जवळ चौदा लक्ष रुपये खर्च करून प्रसिद्ध वास्तुशास्त्रज्ञ श्री. प्रभाकर सावे यांच्या कल्पनेतून साकारलेले प्राचीन शिल्पकलेला आधुनिक शिल्पकलेची जोड देऊन उत्तम प्रकारे बांधले आहे. देवीचे मंदिर निसर्गरम्य अशा



**केळव्याचा समुद्रकिनारा**

समुद्रकिनाऱ्यावर आहे. सागराच्या धीरगंभीर लाटा देवीची स्मुतिसुमने गाताना भक्तांना नेहमीच पहावयास मिळतात. देवीचा द्वारपाल गोवळा देवालयाच्या बाहेर उभा असून त्याचे दर्शन घेऊनच भक्त देवालयात प्रवेश करतो. देवालयासमोर रामकुंड नावाचा तलाव आहे. श्रीराम दंडकारण्यात आले असता सीतेला तहान लागली म्हणून श्रीरामाने हा तलाव निर्माण केल्याचे सांगतात. या तलावात स्नान केले असता कातडीचे सर्व रोग पूर्ण बरे होतात. या तलावाचे नूतनीकरण पालघरच्या माहेरवाशिणी व अमेरिकेत ॲटलांटा येथे स्थानिक झालेल्या डॉ. मीना राव यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ देवस्थान ट्रस्टला रु. पाच लक्ष रुपयांची देणगी देऊन करून घेतले आहे. या तलावातील कारंजे अन् हजारो पणत्या उजळून वैकुंठ चतुर्दशीला साजरा केला जाणारा दीपोत्सव भाविकांचे व परिसरांतील सर्व लोकांचे मन उल्हासित करून जातो. याच देवालयात असलेल्या स्वयंभू शिवलिंगावर गंगेचे कायम वास्तव्य आजही पहावयास मिळते. भल्या पहाटे उठून देवालयापर्यंतचा रस्ता उजळून शंकराला पहाटेच्या मंगलवेळी कमलपुष्पे वाहण्याची तसेच दसऱ्याच्या दिवशी आपट्याच्या झाडावरील पानांची 'सोने' म्हणून लूट करून सीमोल्लंघन साजरा करणे इत्यादी प्राचीन परंपरा आजही केळवेवासियांनी जपल्या आहेत.

शितलादेवीचा परिसर भव्य आणि रमणीय आहे. या ग्रामदेवतेच्या मंदिरातील घंटेच्या निनादाने सारा आसमंत पहाटेच्या रम्य समयी दुमदुमून जातो. देवीचे परमभक्त व शक्तीचे उपासक वेदाचार्य, धनपती कै. बाबा गर्दे हे पूर्वी आपल्या सर्व शक्तिपंथीय शिष्यांसह आश्विन शुद्ध अष्टमीस केळव्यास येत व देवीच्या गाभाऱ्यात सर्व शिष्यांना तीर्थ देत.

केळव्यात शितलादेवीखेरीज कालीका, राम, हनुमान ही हिंदूंची जागृत देवस्थाने असून मुस्लीम धर्मीयांचे दोन दर्गे व एक मशिद आहे. ख्रिश्चन धर्मीयांचे मोतमाऊली दांडा खाडीवरील किल्यात विराजमान झालेली आहे. अशा प्रकारे, सर्वधर्म स्नेहभाव या गावात गुणागोविंदाने नांदताना दिसतो.

केळव्याच्या सीमेवर असलेले श्रीरामभक्त हनुमंताचे एक पुरातन मंदिर आहे. अलिकडेच मच्छीमार समाजातील तरुण व उत्साही बंधुनी देणग्या मिळवून या मंदिराचा जीर्णोद्धार केला असून भव्य अशी मंदिराची वास्तू उभारली आहे. या मंदिरात दरवर्षी चैत्र पौर्णिमेस श्री हनुमान जन्मोत्सवाचा मोठा उत्सव साजरा केला जातो. केळव्यातील मुंबईस नोकरी धंद्यानिमित्त गेलेले सर्व मच्छीमार बंधू या उत्सवास आवर्जून उपस्थित राहतात.

केळव्यातील केळीच्या बागा पुरातन काळापासून प्रसिद्ध असून 'कदलीवह' या संस्कृत नावाचा अपभ्रंश म्हणजेच केळवे. केळव्यातील बहुतेक वाड्या रघुनाथराव शिवाजी या इतिहासप्रसिद्ध श्रीमान सावकाराच्या मालकीच्या होत्या. रघुनाथराव हे फऱ्याने (पूर्वीचे एक माप) रुपये मापित. त्यांच्या गाई म्हशीच्या पायात चांदीचे तोडे असत. त्यांची हुंडी काशीपर्यंत जात असे अशी आख्यायिका आहे. बाराव्या शतकापासून प्रसिद्ध असलेल्या केळवे गावाची भरभराट प्रामुख्याने प्रतापबिंबाच्या काळात अधिक झाली. त्याने तेथे व्यापार उदीम, शास्त्र आणि संस्कृती यांची उभारणी केली. प्रतापबिंबाचा केळव्याचा सरदार कोकाटे यांचे वास्तव्य केळव्याच्या बाजारपेठेत होते. चौकात त्यांचा झेंडा लावण्याचे ठिकाण होते. तेथे अलिकडच्या काळात झेंडाही लावला जात असे. त्याचे सैनिक प्रामुख्याने शेषवंशी, सोमवंशी व सूर्यवंशी क्षत्रिय कुळांतील होते.

स्वातंत्र्यानंतर केळव्यात शैक्षणिक, सामाजिक व सहकार क्षेत्रात बरीच प्रगती झाल्याचे दिसून येते. केळवे शेतकी सहकारी संस्था, मच्छीमार सहकारी संस्था, मीठ उत्पादक सहकारी संस्था, केळवे पान उत्पादक विक्रेता संघ, नूतन विद्या विकास मंडळ ही शैक्षणिक संस्था, भारत वाचनालय ह्या सरकारमान्य ग्रंथालयाची स्थापना, फ्रेंडस्‌ स्पोर्टस्‌ ॲण्ड सोशल असोशिएशन, युवक मित्र मंडळ इत्यादी विविध संस्था स्थापन झाल्या आहेत. केळव्यासाठी या सर्व संस्था एकदिलाने काम करीत असल्याने केळव्याची विकासाकडे आगेकूच प्रशंसनीय आहे. केळव्यातील पाच सहा हजार लोकवस्तीत जवळ जवळ ७० टक्के लोक सुशिक्षित आहेत. संमिश्र लोकवस्ती असलेल्या या गावातील लोक गुण्यागोविंदाने नांदतात. गावाच्या विकासासाठीच्या सर्व योजना एकमताने राबविल्या जातात. केळवेवासियांनी केळव्यासारख्या एका छोट्या विकसनशील खेड्यात एप्रिल १९९४ मध्ये दुसरे कोकण मराठी साहित्य संमेलन भरवून ते यशस्वीपणे पार पाडले. त्यामुळे पु. ल. देशपांडे, मधु मंगेश कर्णिक, के. ज. पुरोहित यांच्यासारख्या सरस्वतीच्या दरबारातील मातब्बर लेखकांचे केळव्याशी आपुलकीचे नाते जोडले गेले. सर्व थरांतील साहित्यिकांची संमेलनाच्या वेळी राहण्याची व्यवस्था केळवेकरांनी आपल्याच घरात आपला साहित्यिक पाहुणा म्हणून केली होती. त्यानंतर कोकणाच्या विविध शहरात भरलेल्या साहित्य संमेलनाची तुलना केळव्याच्या साहित्य संमेलनाशी होऊ लागली. यातच केळव्यांच्या लोकांत असलेल्या आदरतिथ्याची कल्पना येते.

केळवे दांडा खाडीवर तत्कालीन मुख्यमंत्री व लोकसभाध्यक्ष नामदार मनोहर जोशी यांनी केळवेकरांना दिलेल्या आश्वासनानुसार महाराष्ट्र शासनाने चार कोटी साठ लक्ष रुपये खर्च करून प्रशस्त पूल केळव्याच्या दक्षिणेस बांधून पूर्ण केला आहे. त्यामुळे केळवे गावाशी अनेक खेडी जोडली जाऊन परिसराच्या विकासाचे ते एक वरदान ठरणार आहे.

असे विविध ढंगाने नटलेले निसर्गरम्य केळवे गाव मुंबईकरांच्या एक दिवसाच्या सहलीचे आकर्षण ठरले आहे.

**प्रा. अशोक रामचंद्र ठाकूर**
अे / ५, न्यू दहिसरअपार्टमेंटस्‌,
विद्यामंदिर मार्ग, मधुरम हॉल जवळ,
दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८
दूरध्वनी : ०२२-२८२८०२०५

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**२५४२६२७०**

# शिवापराधक्षमापनस्तोत्रम्

*शंकराचार्यांनी रचलेल्या शिवापराध क्षमापन स्त्रोताचा हा पद्य अनुवाद. श्री. नीळकण्ठसुत यांनी अनेक स्तोत्रांची छंदोबद्ध भाषांतरे केली आहेत. त्यांतील काही दिशासाठी त्यांनी उपलब्ध करून दिली आहेत – संपादक*

मातेच्या उदरात स्थापिले पूर्व संचिताने
मलमूत्रासह मला पीडिले जाठर अग्नीने
काय कथावी असह्य दुःखे गर्भावासाची
क्षमा करावी शिव भो शंभो मजला पापाची ।।१।।

मळामुताने बाल्य माखले असे शक्तिहीन
दुग्धप्राशनी सदाच व्याकुळ कुठले हो र
जीव जंतुही चावे घेती रोगांनी रडलो
क्षमा करा मज शिव भो शंभो तुम्हा
न मी स्मरलो ।।२।।



पंचफडांच्या विष दंशाने विचार
कोळपले
सुत धन युवती खा प्या यातच
यौवन ओसरले
वृथाभिमानान अहंपणाने शिवास ना
स्मरले
क्षमा करा मज शिव श्री शंभो मज आता कळले ।।३।।

मन बुद्धी अन् अवयव सारे म्हातारे झाले
त्रिविध ताप अन् पाप रोग हे सर्व फळा आले
शिव ध्यानाविण भ्रमले मन हे मायेतच रमले
क्षमा करा मज शिव शिव शंभो उशिरा आकळले ।।४।।

कुळाचारही कठिण वाटले नाही अनुसरले
मोक्षाच्या वेदोक्त धड्याचे पान न उलगडले
ब्राह्मण असूनी धर्म कर्म ना ध्यास ना ध्यानाचा
क्षमा करा शिव ऐका धावा स्खलित पामराचा ।।५।।

नित्य प्रभाती स्नान करोनी शिवस्नानासाठी
कुठे आणले गंगाजल मी वा पूजेसाठी
अरण्यातली बिल्वदले वा कमळांची माळ
वा न अर्पिली गंधफुले, शिव क्षमस्व
सांभाळ ।।६।।

शिवलिंगाला मी घातले पंचामृत स्नान
गंध लेप ना नार्पण प्रिय तुज कनक फूल
छान
धूप दीप कर्पूर रसामृत नाही नैवैद्य
क्षमा असावी अपराधी मी शिव शंभो
वंद्य ।।७।।

शिवास स्मरूनी विपुल दक्षिणा विप्रां ना
दिधली
वीजजपानी लक्ष आहुती यज्ञी नार्पियली
गंगातीरी तप वा साधन नाही आचरिले
क्षमा करावी शिव श्री शंभो रुद्रहि ना म्हटले ।।८।।

प्राण मिळे प्रणवात मस्तकी सहस्त्र-दल-कमली
इथेच प्रकटे स्वयंप्रकाशी निरव शान्त ज्योती
ब्रह्म वाक्य-तात्पर्य शिवाशी इथेच लय पावे
असे ध्यान मी कधी न केले क्षालन शिव व्हावे ।।९।।

---

स्वदेहाविषयी वृथाभिमान बाळगणारा आत्मघातकी ठरतो.

गुणातीत नि:संग नग्न हो मोह-नमो-नाशी
समाधिस्थ वा सकल ज्ञानमय केवल रूपाशी
एकरूप ना झालो उन्मन मंगल मूर्तीशी
क्षमा करा मज शिव शिव शंभो तुम्हीच अघ-नाशी ।।१०।।

श्री गंगाधर शेखरा स्मरहरा भाली शशी भूषणी
शोभे सर्प गळ्यात चर्म वसती अग्न उठे लोचनी
त्रैलोक्यी शिव तत्त्व एक भरले जाणोनिया अंतरी
होण्या प्राप्त शिवा नको खटपटी द्या चित्त-वृत्ती पुरी ।।११।।

धनसंपत्ती हत्ती घोडे वा ती राज्यश्री
कुटुंबवासी स्नेही पशुधन गृह वा देहश्री
नश्वर सत्वर मना सोड रे जाणुनि वैयर्थ
गुरु चरणी जा भज गौरीहर मोक्ष विचारार्थ ।।१२।।

प्रतिदिन घटते नश्वर जीवन क्षण क्षण क्षरते मौलिक यौवन
दिन गेला ना पुन्हा यायचा काळच भक्षक या विश्वाचा
जल-लहरी-परि लहरी कमला विद्युच्चंचल जीवन-लीला
शरणागत मी भक्त-वत्सला शंभो आता मज सांभाळा ।।१३।।

काया वाचा मने किंवा जे करचरणी घडले
नेत्री श्रोत्री आचरणी वा विपरित आढळले
यथायोग्य की काय ना कळे घडले वा केले
त्या सर्वांची क्षमा असो मज चरण शिवा धरिले ।।१४।।

(श्रीमदाद्यशंकराचार्य)

मराठी भाषांतर

**नीलकण्ठसुत**

●●●

(पान क्र. ६ वरून)

**व्यवस्थापनशास्त्रातील विचारवंत (पूर्वाध)**

**७) रॉबर्ट ओवेन (Robert Owen) (१७७१-१८५८) :**

हा १९ व्या शतकातला ब्रिटीश उद्योगपती होता. व्यवस्थापनशास्त्रातला हा एक तत्त्वचिंतक होता. त्याचा असा विश्वास होता की कामगार ज्या वातावरणात काम करतात त्या वातावरणाचा त्यांच्यावर परिणाम होत असतो. कामाचे तास ठरावीक असावेत, तसेच बालकामगारांवर बंदी आणण्यासाठी त्याने खूप प्रयत्न केले.

त्याच्या स्वत:च्या फॅक्टरीत त्याने कामगारहिताची खूप कामे केली. उदा. घरे, स्वच्छतागृह, शैक्षणिक सुविधा.

त्याने Silent Monitor नावाची एक योजना आपल्या फॅक्टरीत सुरू केली होती. ज्यात चार रंगाचे लाकडी ठोकळे असत. जो कामगार आठवडाभरात विशिष्ट उत्पादनाचे लक्ष्य गाठील त्याला त्यानुसार त्या रंगाचा ठोकळा प्रदान केला जाई. रंगांना विशिष्ट संकेत असे.

त्याचे म्हणणे असे होते व्यवस्थापकाची खरी गुंतवणूक हे कामगारच होत.

(पुढील अंकी चालू)

**प्रा. श्रीनिवास मेघ:श्याम आठल्ये**
ग्रंथपाल, स्वामी विवेकानंद
रात्र महाविद्यालय, आयरे मार्ग,
दत्तनगर, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१,
भ्रमणध्वनी- ९२२४७३४०३८
smathalye42@gmail.com.

●●●

# कन्यादान

*मुलगा हवा अशी अपेक्षा प्रत्येक जोडप्याला असते. पण मुलगा आणि मुलगी यांना असणाऱ्या मायेचा विचार करता, मुलगी कशी चांगली हा आशय या लेखात आहे – संपादक*

अन्नदान, रक्तदान, श्रमदान, प्रेमदान, ज्ञानदान असे दानांचे अनेक वेगवेगळे प्रकार आहेत. पण या सर्व प्रकारांमध्ये कन्यादान हे श्रेष्ठ समजले जाते. कारण इतर प्रकारचे दान देत असताना फारसे कष्ट घ्यावे लागत नाहीत. मनाला वेदना सहन कराव्या लगात नाहीत. पण कन्यादान करीत असताना प्रत्येक आई-वडिलांना खूप यातना सहन कराव्या लागतात. काळजावर दगड ठेवून कन्यादान करावे लागते. आई-वडिल आपल्या मुलींना लहानाचे मोठे करताना, तळहाताच्या फोडाप्रमाणे तिचा सांभाळ करतात. तिचे सर्व हट्ट पुरवतात. पण मुलगी ही परक्याचे धन असते, या संकल्पनेपोटी ती वयात आली की तिचे लग्न लावनू देतात. लग्न झाल्यानंतर आपली मुलगी सासरी सुखी आणि आनंदी असावी, एवढी एकच माफक इच्छा प्रत्येक आई-वडिलांची असते. याशिवाय त्यांना काहीही नको असते. मुलीच्या सुखातच ते आपले सुख मानत असतात. परंतु आपली मुलगी सासरी, सुखी असेलच अशी आजच्या घडीला खात्री देता येत नाही. कारण आज माणूस खूप बदललेला आहे. माणसांची नीतिमत्ता बदलली आहे, त्यांची वर्तणूक बदलली आहे. कोणतेही कष्ट न करता माणूस झटपट श्रीमंतीच्या मागे लागला आहे. त्यासाठी कोणत्याही थराला जाण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

सकाळी वर्तमानपत्राचे पान उघडले की स्त्रियांवरील अत्याचारांच्या अनेक बातम्या आपल्या वाचनात येत असतात. हुंड्यासाठी सासूने सुनेला जाळून मारले, मुलगा होत नाही म्हणून पत्नीला घटस्फोट दिला. संशयी वृत्तीने पत्नीचा पतीकडून खून, सासऱ्याकडून सुनेवर अतिप्रसंग अशा प्रकारच्या वेगवेगळ्या बातम्या रोज वाचायला मिळतात. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांच्या बाबतीत विचार केल्यास एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीच्या दु:खास/अत्याचारास कारणीभूत असल्याचे न्यायालयातील खटल्यांच्या एकंदर आकडेवारीवरून दिसून येईल. सासूच सुनेचा छळ करीत असते. मालकीणच नोकराणीला नाहक त्रास देत असते. मुलगी नको, आपल्या वंशाला मुलगाच हवा, असे एका स्त्रीलाच वाटत असते. वंशाला दिवा पहिजे म्हणून स्त्रीच गर्भपाताला तयार होत असते. मुलगी झाली म्हणून एक स्त्रीच लहान अर्भकास कचरा कुंडीत टाकून देते, अशी अनेक उदाहरणे आपण वाचत असतो आणि ऐकतही असतो. आपल्या पोटात मुलीचा अंकुर वाढत आहे याची चाहूल लागताच स्त्रीच बेचैन झालेली दिसून येते. तिला स्वत:च्या मुलीविषयी तिरस्कार वाटू लागतो. स्वत:च्या आईकडूनच मुलींचा छळ होत असल्याची बरीच उदाहरणे दिसून येतात. पण आपणही एक स्त्री आहोत याचा विसर मात्र तिला यावेळी पडलेला असतो. म्हणून, प्रत्येक स्त्रीने आपणही एक स्त्री आहोत, हे लक्षात घेऊन स्त्री हत्त्या थांबवली पाहिजे. स्त्री हत्त्ये विरोधात काम केले पाहिजे. स्त्रीचा स्वाभिमान राखण्यास मदत केली पाहिजे. ही आज काळाची गरज आहे.

मुलीचा जन्म झाल्यानंतर आई-वडिलांच्या चेहऱ्यावर चिंता दिसून येते. तिच्या भविष्याबद्दल

काळजी वाटत असते. योग्य स्थळ किंवा जोडीदार मिळेल की नाही, याचा विचार सतत मनात असतो. लग्नात येणारा खर्च कसा आणि कोठून भागवायचा याचा मनात ताळमेळ चाललेला असतो. एवढेच काय, मुलीचा गर्भ पोटात वाढत असल्यापासूनच पालकांच्या मनात चिंता सुरू झालेली असते. पुढे मुलीचे लग्न ठरल्यापासून ते अखेरपर्यंत आई-वडिलांस इतरांसमोर आपली मुलीची बाजू म्हणून नमते घ्यावे लागते. वेळप्रसंगी पाया पडावे लागते. पदर पसरावा लागतो. प्रत्येक गोष्टीत माघार घ्यावी लागते. पदोपदी अपमान सहन करावा लगातो. मुलीची बाजू म्हणून सासरची मंडळी त्यांना कमी किंमत देत असतात. त्यांना कमी लेखत असतात. परंतु कितीही मान-अपमान, यातना, वेदना झाल्यातरी मुलीच्या सुखासाठी सर्वकाही सहन करण्याची आई-वडिलांची तयारी असते. डोक्यावरची पगडी काढून मुलीचे सर्व दोष यामध्ये घालावेत अशी विनवणीही वरपित्याकडे करण्यास कमी करीत नाहीत. किती मोठे मन असते त्या आई-वडिलांचे? आपल्या डोळ्यांतील आश्रू पाहून मुलीला वाईट वाटेल म्हणून डोळ्यांतून आश्रू न गाळता बांध घालत असतात. हे सर्व करीत असताना किती वेदना होत असतील त्यांच्या अंत:करणामध्ये? पण या सर्व वेदना चेहऱ्यावर न दाखवता ते निमूटपणे सहन करीत असतात. केवळ आपल्या मुलीच्या चेहऱ्यावरील हास्य पहाण्यासाठी त्यांची धडपड चाललेली असते. आपल्या मुलीसाठी आई-वडिल एवढा मोठा त्याग करीत असताना त्याची किंमत इतरांना कळत नाही. आज अनेक लोक नोटांच्या कागदी तुकड्यासाठी सुनेचा अमानुष छळ करतात. पण मुलीचे आई-वडिल आपल्या काळजाचा तुकडा सासरच्या घरी अर्पण करीत असतात. हे प्रत्येक वराच्या मातापित्याने लक्षात घ्यायला हवे. त्याचबरोबर कन्यादान करून मुलीच्या आई-वडिलांनी आपल्यावर फार मोठे उपकार केले असतात, त्यांच्या या उपकारामुळेच आपल्या मुलाचा संसार सुरळीच चालू असतो, आपल्या घरी वंशाचा दिवा त्यांच्यामुळेच पेटलेला असतो, हे विसरू नये. म्हणून प्रत्येक मुलींच्या आई-वडिलांनी आपली मुलगी म्हणून कोठेही कमीपणा न घेता किंवा अपमानित न होता उलट माझ्यामुळेच तुमचे घर/संसार सुरळीत चाललेला आहे, नाहीतर तुमचा मुलगा केव्हाच रस्त्यावर उघडा पडला असता आणि भिकेला लागला असता असे त्यांना अभिमानाने सांगावे. स्त्री ही लक्ष्मी असते. म्हणनू तिची नारळ खणाने ओटी भरली जाते. ग्रहप्रवेश करताना तिची ओवाळणी केली जाते. अशी लक्ष्मीरूपी धनाची पेटी मी तुमच्या घरी अर्पण केली आहे. माझ्याकडून कसल्या धनाची अपेक्षा करता हे ताठ मानेने त्यांना विचारावे. आपल्या मुलीमुळेच दुसऱ्यांचा संसार चांगला चाललेला असतो हे लक्षात घेऊन, प्रत्येक आई-वडिलांनी मुलींचा अभिमान मनामध्ये बाळगावा.

लग्न होऊन मुलगी सासरी गेल्यानंतर ती फक्त शरीराने तिथे रहाते पण मन मात्र आई-वडिलांकडेच लागलेले असते. आई-वडिलांच्या प्रत्येक गोष्टीकडे किंवा हालचालीवर दुरूनच ती बारकाईने लक्ष देत असतो. माहेरची एखादी ओळखीची व्यक्ती भेटली तर ती प्रथम आई-वडिल कसे आहेत याची चौकशी करते. आई-वडिलांच्या भेटीसाठी तिचे मन आसुललेले असते. पण आई-वडिलांची काळजी करीत असताना ती सासरी मात्र कोणतीही अडणच निर्माण होणार नाही, याचीही तेवढीच काळजी घेत असते. सासर आणि माहेर यांचा समतोल ती बरोबर राखत असते. सासरच्या घरी आपल्या आई-वडिलांची मान शरमेने केव्हाही खाली जाणार नाही किंवा त्यांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची ती परोपरीने काळज घेत असते. आई-वडिलांचा झालेला अपमान तिला सहन होत

नसतो. अशा या कन्यारत्नाचा जन्मात:च का म्हणून तिरस्कार करायचा? कशासाठी तिची बालहत्त्या करायची? काय त्या बालकाचा दोष असतो? म्हणून नारी हत्या थांबवणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. त्याच्यावर योग्य ते संस्कार करून त्यांना घडवले पाहिजे.

मुलगा, ज्याला आपण वंशाचा दिवा म्हणतो किवा समजतो तो पुढे संपूर्ण आयुष्यात करतो तरी काय याचा कधी आपण विचार केला आहे का? संपूर्ण आयुष्यभर तो आपल्या आई-वडिलांना नाचवण्या-पलिकडे काहीही करती नसतो. अगदी तो जन्मल्यापासून ते मृत्यूपर्यंत तो आई-वडिलांना नाचवतच असतो. ज्यावेळी मुलाचा जन्म होतो, त्यावेळी आई-वडिल मुलगा झाला म्हणून आनंदाने नाचत असतात. खुशीने सर्वांना पेढे वाटत असतात. त्याचप्रमाणे मुलगा वयात आल्यानंतर त्याचे लग्न लावून दिले जाते. लग्नामध्ये वडील आनंदाने नाचतच असतात. जन्म झाल्यापासून ते लग्नापर्यंत आणि त्यानंतर सुद्धा त्याच्या गरजा पूर्ण करून घेण्यासाठी तो आई-वडिलांना प्रत्येक वेळी नाचवतच असतो. आणि शेवटी आई-वडिल म्हातारे झाले की तो त्यांना आपल्या हाताच्या बोटावर नाचवण्याचे काम करीत असतो. यापलिकडे मुलगा काहीही करू शकत नाही. मग असा वंशाचा दिवा काय कामाचा? पण मी तर म्हणतो, वंशाला दिवा हवाच कशाला? आपले नाव पुढे चालू रहावे किंवा आपला वंश पुढे चालू रहावा म्हणनू आपणास वंश असावा अशी अपेक्षा असते. पण आपला वंश आपले नाव भविष्यात उज्ज्वल करील अशा प्रकारची हमी नसते. म्हणून, प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तृत्ववाने नाव अमर करणे हे केव्हाही श्रेष्ठ होय. आई-वडिल प्रामाणिक असतील, चारचौघांत वावरणारे असतील, सुशिक्षित असतील, लोकांच्या समस्या सोडवणारे असतील, समाजात त्यांना मान सन्मान मिळत असेल आणि जर त्यांच्या नशिबी मुलगा दारू पिणारा, जुगार खेळणारा, चोरी करणारा, लफंगा निघाला तर वृद्ध वयात काय अवस्था होत असेल त्या आई-वडिलांच्या मनाची? त्यांच्या मनात काय भावना निर्माण होत असतील आपल्या मुलाविषयी? यासाठीच वंशाचा दिवा हवा म्हणून अपेक्षा केली होती का? असे त्यांना वाटल्यावाचून नक्कीच रहाणार नाही. रोज संध्याकाळी दारू पिऊन झुलत मुलगा घरी येत असल्याचे पाहून काय विचार करत असतील आई-वडिल? परिसररातील लोक आपले असे वर्तन पाहून कोणत्या भावनेने आपल्या आई-वडिलांकडे पाहत असतील याचा केव्हा विचार मुले करतात का? दिवसभर काबाडकष्ट करून संध्याकाळी आई-वडिल घरी परत येत असातान रस्त्यात आपले शेजारी काही तुमचा मुलगा काल रात्री दारू प्यायला होता का? असे विचारल्यानंतर काय वाटत असेल आई-वडिलांना? काय अवस्था होत असेल त्यांच्या मनाची? अशा मुलांना जन्म देऊन आपण चूक केली असे त्यांना वाटल्यावाचून रहाणार नाही. प्रत्येक ठिकाणी आई-वडिलांची शरमेने कोठेही मान खाली जाणार नाही, त्यांच्या भाव-भावना दुखावल्या जाणार नाहीत, प्रत्येकवेळी आई-वडिलांच्या भल्याचा विचार करणारी मुलगीच श्रेष्ठ नाही का? मुलीच्या प्रेमामध्ये स्वार्थीपणा नसतो, पण मुलाच्या प्रेमात तो दिसून येतो. म्हणून तर आई-वडिलांच्या मृत्यूनंतर मुलगी नि:स्वार्थ भावनेतून मयताजवळ बसून मोठमोठ्याने हंबरडा फोडत असते. तिच्या डोळ्यातून अखंड अश्रूंच्या धारा वहात असतात. पण दुसरीकडे मुले मात्र संपत्तीचे वाटप कसे करायचे याचा विचारात मग्न असलेली दिसून येतात.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३, सुभाष रोड,
कुंभारखान पाडा, डोंबिवली (प.), जि. ठाणे

●●●

अविचार हा अंधारासारखा तर विचार हा प्रकाशासारखा असतो.

# उपनिषदातील विचार
## (लेखांक ४ था)

*उपनिषदांतील विचारांचा मागोवा घेणाऱ्या लेखमालेतील हा पुढील लेख – संपादक*

**कर्म सिद्धांताचे मूळ द्वंद्वात्मक विचारात :**

अनंत काळापासून मानवाच्या ठिकाणी दोन विचार प्रवाह आढळतात. त्यामुळेच मानव द्वंद्वात्मक विचाराचा मानला जातो. तो जसा मानव आहे तसा देवही आहे. याच कारणाने त्याच्या ठिकाणी नित्य दैवी आणि आसुरी या उभयविध कल्पना आढळतात. मात्र काहीना मानवाच्या ठिकाणी असलेल्या आसुरी कल्पनाच उचलून धराव्याशा वाटतात. अशाना मानव हा जन्मजात पापी आहे असे वाटते. या पापापासून तो स्वत: आपली सुटका करून घेऊ शकत नसल्याने त्याचा उद्धार करण्यासाठी कोणातरी प्रेषिताची त्याला आवश्यकता आहे असे ते म्हणतात. इतर काही मंडळी मानवाच्या दैवी संपत्तीवर विशेष भर देतात आणि त्यांना मानव म्हणजे देव सदृश किंबहुना देवच शरीर धारण करून या भूमंडळावर अवतरलेला आहे असे वाटते. वास्तविक, हे दोनही टोकाचे विचार आहेत. कारण मानवाच्या ठिकाणी या दोनही प्रवृत्ती नित्य असलेल्या आढळतात. एक गोष्ट निश्चितपणे ध्यानात ठेवणे आवश्यक आहे की – आसुरी प्रवृत्तीने मानव जास्त भौतिकवादी बनतो व दैवी संपत्तीने तो स्वत:चे कल्याण साधून घेतो. गीतेतही हाच विचार मांडला गेला आहे. ''दैवी संपत् विमोक्षाय निबंधाय आसुरी मता'' मानवाच्या ठिकाणी जशा हीन गोष्टी आढळतात, त्याचप्रमाणे त्याच्या ठिकाणी तेजस्विता, ओज, बुद्धीची विशालता हीदेखील आढळतात. आणि या गुणांच्या अधिक्याने तो आपला शारीरिक व बौद्धिक विकास साधतो आणि अंतिम सत्यही गाठता येणे शक्य होते.

मानवी जीवन दैवी संपत्तीने व्याप्त आहे, अशी शिकवण उपनिषदातून आढळते. हीच गोष्ट उपनिषदे स्पष्टपणे प्रतिपादन करतात. मानवाच्या ठिकाणी असलेले आत्मतत्व झाकोळून गेल्यामुळे त्याचे ज्ञान त्याला होत नसल्याने अज्ञानाने आत्मतत्त्वाहून मी कोणी वेगळा आहे असे मानवाला वाटू लागते. वास्तविक अन्न, प्राण, मन, विज्ञान आणि आनंद या पाचही कोषांतून त्याचा प्रवास होत असतो. आनंद हा अंतिम सत्याचा स्रोत आहे. मानवाच्या ठिकाणचे अज्ञान दूर झाल्याखेरीज या गोष्टीचा त्याला बोध होणे कठीण आहे. अज्ञान नाशाबरोबरच ही सारी एकाच दैवी तत्त्वात एकवटलेली आहेत हे कळून येईल मगच तो मर्यादित गोष्टीपासून बाजूला होईल, आपण कोण आहोत, याचा बोध करून घेऊ शकेल.

दैवी आणि आसुरी संपत्तीचा झगडा जीवनात अशा प्रकारे नित्य चालू असतो. भौतिक दृष्टी आणि आध्यात्मिक दृष्टी हाही त्यातलाच भाग आहे. स्थूलमानाने विचार करता जड योनी आणि उपजत संवेदना असलेल्या प्राण्यापर्यंत झगडा जाणीवयुक्त नसतो. मात्र मनुष्य व त्याच्या पुढील प्रगत योनी यांच्यात हा झगडा हेतू पूर्वक आणि जाणीवयुक्त असतो. मानवाला विचार करण्याची क्षमता आहे म्हणजेच स्वतंत्रपणे तो विचार करू शकतो. त्याला स्वत:ची उन्नती वा अवनती करून घेण्याचे स्वातंत्र्य आहे. मानव चांगला विचार करू शकतो, चांगले आचरण करू शकतो आणि दैवी जीवन निर्माण करू शकतो. या उलट तो वाईट विचार करू शकतो, वाईट कृत्ये करू शकतो आणि पशू जीवनही जगू शकतो. यालाच आचार शिडी असे म्हणावयास हरकत

मुंग्याच्या वारूळाप्रमाणे हे शरीर पोकळ आहे.

नाही. हीच गोष्ट जीवनातील विविध अंगांना स्पर्श करते. विश्वात असलेल्या नियमबद्ध गोष्टीमुळे ऋषींना मदतीची संकल्पना ध्यानात आली. या संकल्पनेतूनच नीती उदयाला आली. वरुण देवात नीतिनियमांचे काठोरतेने पालन करीत असताना आढळते. अयोग्य वागणाऱ्या मानवाला ही देवता शासन करते. ''या सां राजा वरुणो याति मध्ये सत्यानृते अवपश्यन् जनानाम्।'' योग्य रीतीने वागणाऱ्याना ही देवता वैभवसंपन्न करते ही गोष्ट ऋषींनी अवलोकिली आणि ते काटेकोरपणे, नीतीने वागणारे झाले. मानव जसा वागतो तसा तो घडतो. चांगले आचरण करणारा चांगला होतो. वाईट कर्म करणारा वाईट होतो म्हणून (छांदोग्य उप.) असे म्हटले आहे की, मानव मृत झाल्यावर दोन वेगळ्या मार्गाने जातात. देवयान व पितृयान. देवयानाने जाणारा मार्ग हळू हळू ब्रह्माकडे नेणारा आहे. पितृयानाने जाणारा मानव पुन: भूलोकी जन्म घेतो. हा वैश्विक नियम आहे. येणेप्रमाणे कर्मसिद्धांत प्रस्थापित करण्याची कामगिरी उपनिषद्काराने केली आहे. ती मानवाला एक देणगीच ठरली आहे. कारण यातूनच सुटण्याचा मार्ग मानवाला शोधता येणे शक्य झाले. तो मार्ग म्हणजेच कर्मयोग होय.

**कर्मयोग :**

कर्मयोगाचे विवेचन ईशावास्य या उपनिषदात चांगल्या प्रकारे केलेले आहे. पहिल्या मंत्रात सांगितले आहे की, या पृथ्वीतलावर जे काही आहे ते यच्चयावत् परमात्मरूपानेच व्याप्त आहे. परमात्म वस्तू खेरीच अन्य काहीच नसल्याचा अनुभव घेणे, याला विश्वस्वरूपात अगर अन्य उपभोग्य स्वरूपात पाहण्याचे सोडून दे. अशा प्रकारे तू आत्मतत्वाचे रक्षण कर. कसल्याच प्रकारच्या ईषणांचा (दारा, वित्त, पुत्र, लोक) विचारही मनात येऊ देऊ नकोस. आत्मज्ञानाचा अनुभव घेत संन्यस्त वृत्तीचा हो, असा उपदेश केला आहे. दुसरा मंत्र कर्मयोगा संबंधित आहे. ''कुर्वन्नेवेह कर्माणि जिजीविषेत् शतं समा:। एवं त्वयि न अन्यथा इत: अस्ति न कर्म लिप्यते नरे।'' पहिल्या मंत्रात ज्ञानसाधना करू शकतात त्यांच्या बद्दल विचार सांगितला. ज्ञानमार्गाने जाणे सर्वांनाच शक्य नसल्याने त्यांच्यासाठी कर्माचरण करत पूर्ण आयुष्य जगण्याची इच्छा बाळगावी असे सांगितले आहे. कर्माने अन्त:करणाची शुद्धी होते. या शुद्धीसाठी केवळ कर्म करणाऱ्याला कर्म बंध चिकटत नाही. इथे 'एव' हा शब्द विशेष महत्त्वाचा आहे कर्म करावे, केवळ कर्मच करावे यांतील फरक ध्यानात घेणे आवश्यक. कर्म हेतूपूर्वक अगर फलाशेच्या अपेक्षेने न करता ती आत्म शुद्धयर्थ असावीत. ती शास्त्रविहित असावीत. ईश्वरार्पण बुद्धीने कर्म करीत आयुष्य कंठावे. यामुळे दोन गोष्टी साध्य होतात आत्मशुद्धी होते. आत्मज्ञानाचा मार्ग सुलभ होतो. या कर्मयोगाचे आचरण करून मानव कर्म बंधातून मुक्त होतो.

**जाणिवेच्या अवस्था :**

उपनिषदात जाणिवेच्या तीनही अवस्थांचा विचार करण्यात आलेला आहे. स्वप्न, जागृती व सुषुप्ती. या प्रत्येक अवस्थेत जाणिवेचे स्वरूप कसे बदलत जाते हे अभ्यासावे. जागृत अवस्थेत जाणीव बाह्यवस्तूवर अवलंबून असते, तर स्वप्नात ती मन निर्मित गोष्टींवर अवलंबून राहते. गाढ निद्रेत ज्याला सुषुप्ति म्हणतात – त्यावेळी इंद्रिये आणि मन ही दोन्ही विराम पावतात. ती शांत झाल्यामुळे काही दृश्य स्वरूपाने त्यावेळी कोणतेही दर्शन घडत नाही. याच कारणाने बाह्य वस्तूशी संबंधही येत नाही. सर्वसाधारण जाण यावेळी शांत झालेली असली तरी शुद्ध जाण असते. हीच नेणीव अवस्था होय. म्हणजे ही शुद्ध जाणीव निषेधात्मक असते. मात्र ही जाण वस्तूपासून पूर्ण मुक्त झालेली असते असे काही म्हणता येणार नाही. कारण ही जाण क्षणात स्वप्नात तर दुसऱ्या क्षणी जागृतीत असा प्रवास करील आणि या जाणिवेत पुनरपि दृश्य व बाह्य वस्तूशीच संबंध जडतो. थोडक्यात सुषुप्तीच्या अवस्थेत वस्तू अजाणतेपणाने

असतात इतकेच. यापुढील जाणिवेची अवस्था म्हणजेच तुरीया वा चतुर्थ अवस्था होय. ही जाणिवेची उच्च अवस्था मानली आहे. या स्थितीत जाणीव सर्व दृश्य अगर बाह्य पदार्थापासून कायमची मुक्त असते. हा अनुभव योगी वा थोर गूढवादी मंडळी यांचा आहे. हा सामान्यांसाठी नाही. मात्र सामान्यांनाही हा अनुभव घेता येणे शक्य आहे त्यासाठी मानसिक क्षमता वाढवावी लागेल.

**इंद्रियातीत अनुभवाचा उपाय :**

इंद्रियातीत अनुभव कसा घेता येईल, त्यासाठी कोणता उपाय वा मार्ग आहे हा प्रश्न मानवापुढे उपस्थित होतो. सर्वेऽपि सुखमिच्छन्ति। सगळ्यांचा धडपडाट हा सुखासाठीच असतो. दु:ख कोणालाच नको असते. मात्र आपण सारे ज्या एका सुखाच्या कल्पनेने भाराऊन जाऊन सारी धडपड करतो तो कोणत्या प्रकारच्या सुखासाठी, हा विचार मात्र करत नाही. आपल्या सुखाची कल्पना तात्कालिक स्वरूपाची अगदी निम्न पातळीवरची असते. तसेच ती काही काळच टिकणारी असते. कठ उपनिषदात यावर चांगला प्रकाश टाकला आहे. यमाने नचिकेताला अनेक उत्तमोत्तम गोष्टी देऊ केल्या. अनेक सुखसाधने देऊ केली परंतु नचिकेत यमाला म्हणाला ही सारी सुखे क्षणिक आहेत. त्यातून आयुष्य तुझ्या मर्जीवर अवलंबून म्हणून यमा ही सारी सुखे तुझी तुलाच लखलाभ असोत. हे नृत्य ह्या नृत्यांगना हे गीत तुलाच प्रमुदित करोत. उपनिषदांच्या मते स्वर्ग सुखही अत्पल्प म्हणजे चिरंतन स्वरूपाचे नाही आणि त्यासाठी कर्मकांडाचा पाठपुरावा करावा लागतो. या विषयी मुंडक उपनिषदात असे म्हटले आहे की केवळ यज्ञीय कर्म कांडाने सत्य कधीच जमजणारे नाही. त्या कर्माच्या फळाचा अंमल संपला की पुन: भूलोकावर दु:खे भोगण्यासाठी यावे लागते. ही गोष्ट गीतेत स्पष्ट केली आहे.' क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति। खरे आणि शाश्वत सुख आत्मविकासात आहे.

**आत्मविकास साधण्याचा मार्ग :**

प्रत्येक मानवाला आपला विकास व्हावा आपले व्यक्तिमत्त्व पुष्ट व्हावे असे वाटते. हा विकास शारीरिक, मानसिक, बौद्धिक आणि शेवटी आत्मिक अशा स्वरूपाचा असतो. शरीराचे व्यक्तिमत्त्व, सुदृढता व निरोगीपणा यावर अवलंबून असते; म्हणूनच 'शरीरं आद्यं खलु धर्म साधनम्' असे म्हटले जाते.

हा विकास योगाच्या पहिल्या तीन अंगानी साधता येतो. यम, नियम आणि आसन यातून शरीर सुदृढ, निकोप व निरोगी राहू शकते. मनोविकास – प्राणायाम व प्रत्याहार यापुढील दोन अंगानी साधता येतो. मन संयमित, संतुलित व शांत राहू शकते. बुद्धीचा विकास हा तिच्या स्थिरपणाने साधता येतो. त्यासाठी धारणा आणि ध्यान या अंगांचा उपयोग होतो. अनेक ठिकाणी विभागून जाणारी बुद्धी ही एकत्र करता येते. गीता म्हणते – अव्ययसायिनां बुद्धय: बहुशाखा: अनंताश्च अत: व्यवसायात्मिका बुद्धि: एका एव अस्ति। आत्मिक विकास या तीनही विकासानंतर साधता येतो आणि त्यासाठी शेवटचे आठवे अंग समाधी उपयुक्त ठरते. अशा प्रकारे सर्व बाजूनी विकास साधून सर्वाशी भातृबुद्धीने जवळीकता साधून त्यातून वैश्विक मनाची एकरूपता प्राप्त करून घेणे हेच मनुष्याचे महत्त्वाचे कर्तव्य ठरते. हे म्हणजेच पूर्णज्ञान, यथार्थ ज्ञान. ज्यात आपण आहोत जे आपल्यात आहे आणि ज्याचा आपल्यास बोध होत नाही तो करून घेणे हेच व्यक्तिमत्त्वाचे विकसन होय. या विकासशील प्रवृत्तीलाच 'प्रवृत्ति' मार्ग म्हणतात. याच्या पुढील मार्गाला निवृत्ती असे नाव देण्यात आले आहे.

**निवृत्ती मार्ग :**

जे काही सुंदर आहे, प्रिय आहे, प्रेममय आहे त्याचा बोध सर्व प्रकारचे ज्ञान झाल्यावर होतो आणि त्यानंतर एवढेच ध्यानात येते की ही उत्कटतेने होणारी

व्यक्तता म्हणजे अनंत प्रकारे विनटणाऱ्या त्या सत्याचेच विविध दर्शन आहे. आणि तेच आपल्या अंतर्यामी आहे. या विचाराची स्पष्टता ध्यानात येण्यासाठी मैत्रेयी आणि याज्ञवल्क्य यांचा संवाद बोलका आहे. याज्ञवल्क्य आपल्या दोनही बायकांना धन देऊन संन्यस्तवृत्तीचा अवलंब करून तपश्चर्येसाठी वनात निघाले. कात्पायनी ही साधी बाई होती. ती धन घेऊन गप्प बसली. मैत्रयी म्हणाली – महाराज या धनामुळे मला आत्मज्ञान मिळेल का? याज्ञवल्क्य म्हणतात – अमृतत्वस्य नाश: अस्ति विन्तेन। धनानी अमृतत्वाचा नाश होतो. मैत्रेयी धन नाकारते. आणि आत्मज्ञान कशाने होईल तीच गोष्ट मला पाहिजे. कृपा करून ती मला द्या असे म्हणते. यावर याज्ञवल्क्य म्हणतात – हे मैत्रेयी न वा अरे पति:कामाय पति: प्रियं भवति आत्मनस्तु कामाय पति: प्रियंभवति। पती म्हणून पति प्रिय होत नाही तर आपले आत्मतत्त्वावर प्रेम असल्याने पति प्रिय होतो. याच प्रमाणे इतर बाह्य गोष्टीचे जाणावे. आत्मनस्तु कामाय सर्व प्रियं भवति। सारे बाह्य पदार्थ आतील आत्मतत्वाला जागी करणारी साधने होत. संयम, शिस्त, प्रेम आणि सौंदर्य आपल्या अंतर्यामीच असतात आणि तीच आपण जगावर आरोपित करतो. विश्व आपणावर काही आरोपित करू शकत नाही. पदार्थामुळे आपल्यावर परिणाम होतो, असे वाटणे हे अज्ञान-मूलक आहे. अशा प्रकारे विश्वाचे दर्शन घडताच साहजिकच बाह्य विश्वातून आपले मन बाजूला होते आणि अंतर्यामी असलेल्या आत्मतत्वाचाच कसोशीने शोध घेऊ लागते. हाच अंतर्मनाचा धांडोळा होय. मन ज्या वेळी या मार्गाचा अवलंब करू लागते तेव्हाच खऱ्या अर्थाने मन अंतर्मुख होऊ लागते. या प्रकारालाच निवृत्ती म्हणतात. निवृत्ती याचा अर्थ प्रयत्न शैथिल्य असा नसून शोध घेण्याची मनाची भूमिका बदलणे असाच होतो. प्रकाशाचा झोत अंतर्यामी टाकला हे न समजल्यामुळे काही मंडळी या गोष्टीला उगाच नावे ठेवत असतात. निवृत्ती मार्ग म्हणजे व्यवहारातून उठणे अशी समजूत करून घेतात. वास्तविक अंतर्मनाचा धांडोळा घेणारी व्यक्ती फार वरच्या श्रेणीत पदार्पण करीत असते. हीच मुख्य शिकवण उपनिषदात आढळते. एकाग्रता, बुद्धीचा विकास याची आपल्याला नितांत गरज आहे. निसर्गावर प्रेम सौंदर्याबद्दल आस्था आणि सामाजिक सेवा या गोष्टी जितक्या महत्त्वाच्या आहेत त्याहून स्वत:चे स्वत: स्वामी होण्याची आवश्यकता जास्त आहे. ही जाणीव वैश्विक स्वरूपाची आहे. शाश्वत आहे व आत्मस्वरूपाची आहे. ही ठोस जाणीव करून देऊन ऋषी आपल्याला जागे करतात. मनुष्य हा साक्षात ईश्वरांश आहे, ही जाणीव होणे म्हणजेच 'स्व' ची जाणीव होणे. ही जाणीव ज्याला होते तो नित्य मुक्तच आहे. तेव्हा तो परिपूर्ण होतो. त्याच्या साऱ्या भौतिक स्तरावरील सुखाच्या कल्पना – ऐहिक वा पारलौकिक असोत गळून पडतात. या साऱ्या कल्पना 'स्व' ची जाणीव होई पर्यंतच टिकतात म्हणून प्राण, ज्योती, आकाश, ब्रह्म, आत्मा आनंद तत् सत् ॐ इत्यादी मानवाची ध्येये ठरतात. आणि मानवाची वाटचाल अंधारातून प्रकाशाकडे सुरू होते. म्हणून ऋषी म्हणतात–

असतो मा सद् गमय।
तमसो मा ज्यातिर्गमय।
मृत्योर्मा अमृतं गमय।

हीच अमरतेची शिकवण उपनिषदामुळे साऱ्या जगाला प्राप्त झाली आहे. हाच निवृत्ति मार्ग होय.

क्रमश:

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ, ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

श्री. यशवंत साने यांच्या लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक

**प्रास्ताविक :**

**'बीज' ही संकल्पना फारच गूढ आहे.** मला तो प्रसंग स्पष्टपणे आठवतो!! कित्येक वर्षांपूर्वी, म्हणजे कमीत कमी २० वर्षांपूर्वी, माझा माझ्या एका श्रेष्ठ परममित्र, मराठी साहित्यिकाशी झालेला वाद आठवतो!!

माझा तेव्हा सुद्धा ठाम विश्वास होता की भारतीय 'ज्ञानपद्धती', संस्कृती व साधने यांमध्ये एक प्रकारच्या अतुलनीय, वैशिष्ट्यपूर्ण अशा 'संकल्पना' आहेत की त्या संपूर्ण जगात, धर्मात, संस्कृतीमध्ये कुठेही आढळत नाहीत!!

थोडक्यात म्हणजे ('**unique**') **अद्वितीय** अशा!! माझा मित्र हा 'समाजवादी' होता. आपल्याला नावाशी काही कर्तव्य नाही. पण, त्याच्याकडून, ह्या विधानाचा तिथल्यातिथे निकाल लावण्यात आला. 'भारत' म्हणजे 'इंडिया' व ह्याच्या देश व संस्कृती मध्ये 'जगावेगळे', विशेष असे काहीच नाही. अत्युच्च व श्रेष्ठ म्हणण्यासारखे असेही काहीही नाही. हा केवळ 'अभिनिवेशी', 'असत्य', पोकळ राष्ट्राभिमानी दावा आहे!!

**(Chauvinistic) :**

ते दिवस होते युरोपियन संस्कृतीतील प्रकाशाचे!! भौतिक प्रगती करण्याचे तसेच, ते दिवस व काळ हा युरोपियन संस्कृतीतील वाढलेल्या मार्क्सवादी विचारांचा व प्रभावाचा होता. कार्ल मार्क्स ह्या भौतिकवादी तत्वज्ञानातील व कामगार, भांडवलदार या वर्गलढ्यावर व संघर्षाच्या तत्त्वज्ञानावर सगळ्या जगातील संस्कृत्या तपासण्याच्या व भौतिकवादी सामाजिक, राजकीय, आर्थिक सुधारणावादाचा काळ होता. राजकीय, सामाजिक व आर्थिक क्रांतीचा काळ होता.

त्यामुळे, भारतीय उद्धाराच्या संकल्पनांचा बिलकुल परिचय नसणारा किंवा त्या संकल्पनांचा केवळ विकृत तोंडवळा बघण्याचा सराव झालेला समाज होता. स्वत:च्या आत्म्याचा व संस्कृतीचा विसर पडणारा काळ होता.

पण, जगात त्यानंतर इतक्या झपाट्याने बदल घडत गेला आहे की, आता भांडवलशाही, समाजवादी तत्त्वज्ञानाच्या अंमलाखाली, जो गोंधळ माजला आहे, त्यामुळे काही जबाबदार विचारवंत भारताच्या संस्कृतीमध्ये काही उत्तरे सापडतात का याचा विचार करू लागली आहेत.

**भौतिकवादी तोकडे तत्त्वज्ञान :**

भौतिकवादी विज्ञान, भांडवलदारी उत्पादनपद्धती व अर्थकारण या मार्गाने समाजाची 'प्रगती' - (खरी प्रगती) होते की नाही, याबद्दल जबरदस्त शंका उपस्थित केल्या जात आहेत. मानवी मूल्यांचा झपाट्याने व वेगाने जो अध:पात होतो आहे त्याबद्दलही काळजी वाटू लागली आहे व ह्या सामाजिक प्रलयातून काही मूलभूत दिशा व मार्ग भारतीय संस्कृतीत मिळतात किंवा काय याची विचारणा सुरू झाली आहे. अर्थात ही जिज्ञासा

केवळ पृष्ठभागावरील तरंगाच्या पातळीचीच आहे. खोलवर तलास व शोध, अशी नाही!!

या पार्श्वभूमीवर, मी जास्त खोलवर विचार करू लागल्यावर मला जे काही प्रकाश दर्शन व विमर्शज्ञान होऊ लागले त्याचा विचार आपण दिशाच्या काही अंकात करणार आहोत. अर्थात हा प्रयत्न सुद्धा भारतीय संस्कृतीच्या सिंधुसागरातील काही ओंजळी तपासण्याइतकाच होऊ शकेल.

**मानवी अस्तिवाचा वैश्विक सत्यार्थ? :**

मूळ प्रश्न आहे तो मानवी अस्तित्वाच्या वैश्विक सत्याचा. हा मानव मर्त्य आहे. तसेच, हे जग सुद्धा नाशिवंत आहे. ह्या जगाचा जो दृश्य व्यवहार, व्यापार आहे त्याचा पूर्ण परिचय वा आवाका आजही नाही, म्हणूनच (Discovery Channel) या टी.व्ही वर दिसणारे प्राणी, वनस्पती वगैरे दर्शन माणसाला अचंब्यात टाकते आहे. पण, त्यातील दारुण सत्य हे आहे की हे सर्व सुंदर, रंगीत, चित्रविचित्र जग, त्यातील जीवन संघर्ष हे नाशिवंत व एखाद्या नाट्यप्रयोगासारखे आहे. मग सत्य काय आहे?

**अनुत्तरित प्रश्न :**

ह्या प्रश्नाचा आवाका आज जसा अनुभवाला येतो तसाच तो अनेक शतके व युगे मानवी समाजाला पडला आहे व अजूनही **अनुत्तरित** आहे.

मानवी समाजाने ह्या अनंतातील अनुत्तरित प्रश्नांचा जवाब वा अन्वयार्थ लावण्याचे केलेले सगळे प्रयत्न अपुरे व अर्धवट आहेत. परस्पर विरोधी सुद्धा आहेत. पण, त्या प्रत्यनांतून काय निर्माण झाले असेल तर अनेक 'डोंगरा एव्हढी' तत्त्वज्ञाने, शास्त्रे, पंथ, संप्रदाय व राजकीय, आर्थिक, सामाजिक राज्ययंत्रे.

त्यांचा आपआपसातील संघर्षात्मक इतिहास, पूर्णपणे लांछनास्पद व रक्तरंजित संहार आहे. दुसरे काही नाही!! अनंत काणेकराच्या लघुनिबंधातील ''एक दहाडे मखूंज छे!'' ह्या हतबल व अज्ञानी बेडकां सारखा!! (पिकली पाने संग्रह)

**भारतीय संस्कृतीतील आगळे वेगळे प्रयत्न :**

मग, भारतीय संस्कृतीने हा प्रश्न कसा हाताळला हे बघणे अत्यंत मोलाचे ठरेल.

**विश्वरचना, व्यवहार ह्यांच्या बीज संकल्पना :**

मुख्य मुद्दा म्हणजे भारतीय संस्कृतीला एक जगावेगळा, अद्वितीय अशा ज्ञानाचा वारसा लाभला. त्या वारशाचे नाव **'वेदिक श्रृती ज्ञान'** की ज्याला **'अपौरुषेय'** ज्ञान समजले जाते.

हे विधान आता खोलवर तपासल्याखेरीज व त्या संकल्पना **'शब्दांच्या पलीकडे'** अनुभवल्याखेरीज **'सत्यज्ञानाच्या मार्गावर पाऊल'** पडणे अशक्य आहे.

'सत्यज्ञानाचा अर्थ', भारतीय ज्ञान पद्धतीत **'अनुभूती जन्य' 'समाधिजन्य'** ज्ञान असे मानले जाते.

**सृष्टि निर्मीती व ज्ञान ह्यांचा संबंध व नाते :**

ह्या प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी ऋषी मुनींनी प्रथम ह्या विश्वाच्या **सृष्टिरचनेचा** अभ्यास आरंभला. त्यात सुरवात झाली तो विचार ऋग्वेदातील अनेक सूक्तांत सांपडेल. **'नासदीय सूक्तात'** सापडेल. हा आरंभ आहे. त्याची शैली 'नोर्त बोर्त' ही आहे. प्रकृतसूक्तांत नासदीय, कोन व स्कंभ सुक्ते येतील.

केन उपनिषदाची – प्रश्नोत्तर शैली आहे. प्रयत्न मुख्यतः **सृष्टि निर्मीती बद्दलचे 'बीज ज्ञान'** हाच आहे.

आकाशात अंधार पसरल्यावर आकाश काळे वाटते.

पण, **पुरुषसुक्ताचे** वैशिष्ट्य हे आहे की त्यात अत्यंत ठाम व निश्चयात्मक विधाने केली आहेत व अवघ्या १६ ऋचांमध्ये **सृष्टिरचनेची 'रहस्ये'** सांगितली आहेत. त्यातील **सृष्टिरचनेचे 'लक्ष' 'पुरुष' ही संकल्पना आहे.** पुरुषसुक्तातील ३ रा मंत्र आहे :-

**''एतावानस्य महिमाअतो ज्यायांश्च पुरुषः।''**
प्रथम हे सांगितले पाहिजे की 'पुरुष' ही कल्पना **(Male, Female) स्त्री, पुरुष ह्या भौतिकवादी, व्यवहारी शब्दांत घ्यावयाची नाही.**

'**Embodied Consciousness**' म्हणजे **कॉंगशनोस ने केलेले एका वैश्विक (Form) रुपात केलेले वास्तव्य - 'पूर शयनम्' असे आहे.**

'पुरुष' = (चैतन्य + शरीर [Body])

ही 'पुरुष संकल्पना 'अव्यक्त' जगातील 'बीज' संकल्पना आहे.

पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर, स्वाध्याय मंडळ पारडी यांच्या 'पुरुषसूक्त', ह्याचा 'अर्थ, भावार्थ आणि स्पष्टीकरण, ह्या पुस्तकांत मांडलेला 'पुरुष संकल्पनेचा विचार मर्यादित आहे. पृथ्वी व मानवी समाजापुरता मर्यादित केला आहे. 'मानवसमाजरूपी पुरुष' असा थोडा घाईघाईने अर्थ लावला आहे, कदाचित राष्ट्र ह्या संकल्पनेशी Short cut ने जोडण्यासाठी. पण, मूळ बीज सृष्टि निर्मीती कल्पना विशद करण्याचा विशेष प्रयत्न केलेला दिसत नाही.

पण, असे करून चालणार नाही. आपण पुराण ह्या वैश्विक सृष्टि निर्मीतीच्या आरंभीचा विचार करतो आहोत.

ह्या चुकीच्या संकुचित संकल्पनेच्या अर्थाचा अनर्थ टाळण्यासाठी आपण थोडे मागे जाऊ या.

एका उपनिषदाचे नावच मुळी '**पिंडब्रह्मांडोपनिषद**' असे आहे. काय आहे त्यांतील मुख्य निवेदन?

(अष्टमी कण्डिका)

**''पिंडमेव सोम्य ब्रह्मांड विजानीहि।**

**पिण्डे ब्रह्माण्ड समाप्यते।।''**



**चित्र नं १ पिंड ब्रह्माण ऐक्य**

ह्याचा अर्थ असा आहे की 'हे सोम्य! हे पिंडच ब्रह्मांड आहे, असे जाण!! पिंडामध्ये ब्रम्हांड समाप्त है - (पूर्णपणे सामावले आहे - व्यक्त स्थितीत आहे.

सूक्तात **पिंडाला 'पुरुष'** व **ब्रह्मांडाला 'लोक'** असे म्हणले आहे. हे लक्षात असू द्या!!

**वैदिक विज्ञानातील महायुक्ति :**

त्यामुळेच पृथ्वीवरच्या मानवाला ब्रह्मांडाचा शोध घेण्यासाठी एक महान सूक्त हातात आले आहे. **काय आहे ही युक्ती? महायुक्ति!!**

**''यथा पिंडे तथा ब्रह्मांडे'' :**

याचा महत्त्वाचा निष्कर्ष म्हणजे ह्या पृथ्वीवर जो 'पिंड' पुरुष हा फॉर्म (रूप) प्राप्त होतो आहे - (सातत्याने) त्या देहरूपी प्राणी वा मानव वगैरे जीवांचा, अभ्यास केल्यास **ब्रह्मांडाचा** (Universe) **अभ्यास होऊ**

**शकेल**. अर्थात हा अभ्यास केवळ भौतिक दृष्टिने शकणार नाही, तो आवश्यक असेल, पण तो बऱ्याच अंशाने प्रतीकात्मक किंवा Symbolic असणार. त्यावरून मात्र कार्यरत असलेल्या, इंद्रिय (रूपी) मार्गाने पूर्णत: होऊ त्यावरून मात्र काँगशनेस किंवा आत्म्याच्या मूळ सामर्थ्यावर अवलंबून, ब्रह्मांडाच्या मूळ व पूर्णांशी संकल्पनेचा ठावठिकाणा व पूर्णज्ञान प्राप्त होऊ शकेल. असे साधन मिळवणे हे मुख्य उद्दिष्ट असावयाला हवे.

SupraC

Unity

भौतिकवादी विज्ञानाच्या अफाट प्रयत्नातूनही आपल्याला केवळ ह्या सृष्टिज्ञानाची एकांगी, भौतिक, नाशिवंत व **दुय्यम दर्जाचीच 'पातळी-ज्ञान' व 'ज्ञान प्रक्रिया'** प्राप्त होते आहे. मूळ बीज ज्ञान व संकल्पना प्राप्त होत नाहीत.

ह्या ज्ञानाचा **शेंडा व बुडखा** दोन्ही हाती लागत नाही! लागणार नाही!! ह्या भौतिकवादी ज्ञानाच्या ज्या नैसर्गिक निर्मीतीत आखलेल्या मर्यादा आहेत त्या उलटून पलीकडे गेल्याशिवाय म्हणजे **Transcendental** मर्यादापलीकडील ज्ञान होणे अशक्य आहे!!

मग ह्या भौतिकातील 'पिंडाचा' अभ्यास केल्यास मात्र आपल्याला पूर्ण ज्ञान होऊ शकेल. ही युक्ती आहे. आणि ही तरकीब सुद्धा सृष्टिनिर्मीतीतच गूढ आवरणात दडलेली, पण स्थित व उपलब्ध आहे.

केव्हढी ही उपलब्धी आहे!! त्याची कल्पना इथल्या विद्वानांना पूर्णपणे झालेली नाही, किंवा झाल्यावरही त्या ज्ञान क्रियेचा वापर पूर्ण अधिकाराने करण्याचा प्रयत्न झालेला दिसत नाही!!


त्यामुळे श्रृती ज्ञान, वेद संहिता ह्या एखाद्या जुन्या पुराण्या ट्रंकेत कुलूप लावून बंदिस्त अवस्थेत ठेवलेल्या निद्रिस्त दागिन्यांसारख्या अवस्थेत आहेत. त्यांचा उपयोग वा वापर होत नाही. एव्हढेंच नव्हे तर ते दागिने (Wealth of Knowledge) म्हणजे सत्य ज्ञानाची दालने व दर्शने आहेत, ह्याचा सुद्धा थांगपत्ता नाही.

ह्या कुलूप लावलेल्या ट्रंका केवळ आदराने व श्रद्धेने न उघडता पिढ्यान्‌पिढ्या वारसा हक्काने आजच्या हिंदू समाजाला प्राप्त झाल्या आहेत. ह्या दागिन्यांचे महत्त्व सांगणाऱ्या कथा Mythology फक्त श्रद्धेने वा थोड्या अश्रद्धेनेही ऐकण्यात येतात. ह्या ज्ञानाचा वापर झाल्यास मानवाचे व मानवी समाजाचे अनेक प्रश्न सुटतील हा विश्वास गमावला गेला आहे. फार खंत वाटणार ही परिस्थिती आहे!!

**दशांगुले पुरुष :**

ह्या 'पुरुष' संकल्पनेची एक दूसरी आवृत्ती - **'दशांगुले पुरुष'** ही आहे. सध्याचा मानवी फॉर्म हा या संकल्पनेचे पूर्ण स्वरूप आहे. हे समीकरण खालील प्रमाणे आहे -

**१) सहस्त्रशीर्षपाद - पुर = ब्रह्मांड**
**२) दशांगुले - पुर = पिंड**
**३) पूर = शरीर**



Picture No 3


**'पूर' ह्या संकल्पनेत स्वेदज, अण्डज आणि जरायुज योनि गृहीत आहेत.**

पण, मानवी शरीराला **'देव की पुरी'** म्हणजे **'देवाना पू:'** म्हणाले आहे व अथर्ववेदामध्ये तर 'अयोध्या पुरी' म्हणले आहे.

ह्या 'अयोध्या' चा अर्थ काय? तर ''योध्दुमशक्या'' म्हणजे असूर वा मानवी शत्रूंना ह्या पुराला जिंकणे अशक्य आहे. हा अजिंक्य किल्लाच आहे. ह्या पुराकडे म्हणजे किल्ल्याकडे जीवात्म्याचे वा काँगशनेसचे वास्तव्य संभाळण्याचे व संरक्षणाचे काम आहे. साधे रोग प्रतिबंधक लढेच नव्हे तर, राजस, तामस, सात्विक प्रवृत्तींचे लढे आसुरी प्रवृत्ती, वामाचारी सिद्धी प्रयत्न वगैरे अनेक शत्रूंशी, असूरांशी युद्ध करण्याचे सामर्थ्य, ह्या पिंडाला दिले आहे. अनंत काळ टिकणारे जनन क्रियेचे, पुनर्जन्माचे जैविक यंत्र सुद्धा या 'पूरांत' दिले आहे. **'पिंड-पुराला' दिले आहे.**

**पिंडाचे आध्यात्मिक साधन यंत्र :**

**योगिक, आध्यात्मिक साधना, तपस्या करून ह्या देहाच्या मदतीमार्फत मानवी कॉशसनेसची 'उर्ध्वगती' 'उन्नती' किंवा भगवद्गीतेतील सांगितलेला आत्म्यानेच स्वत:च्या आत्म्याचा उद्धार करण्याची गुरुकिल्ली व यंत्रणा दिली आहे.**




ह्या किल्लीने भौतिक ज्ञान मिळवणे चालूच आहे. पण त्याला पूर्णत्व देणारे (Integrality) 'आध्यात्मिक ज्ञान' मिळवण्याची युक्ती व साधने आणि यंत्रणा दिली आहे.

**व्यक्तिगत व सामाजिक :**

**प्रयत्न हवा आहे की ही रचना जाणण्याचा व उपयोगांत आणण्याचा!! भौतिक जगांतल्या अनेक समस्या ह्या ज्ञानाने उलगडणार आहेत.**

**मानवी देह, 'पुरुष' संकल्पना :**

एक उदाहरण पुरे आहे. **''देह की संज्ञा पुरुष है।''** अथर्व वेदामध्ये वर्णन आहे की **''रेत: कृत्वाज्यं देवा: पुरुषमाविशन्''** सृष्टिनिर्मीतीच्या वेळेस जो प्रथम यज्ञ (बीजरूपी यज्ञ संकल्पनेतून झाला)

**''यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्**
**तानि धर्माणि प्रथमन्यासन।**
**ते ह नाकं महिमान:सचन्त**
**यंत्र पूर्वे साध्या: सन्ति देवा:।।     ।।पु.सू. १६।।**

त्या **यज्ञात** देवांनी 'रेतस् शक्ति' हे ''**आज्य**'' म्हणून वापरले. आणि प्रवेश केला त्या 'पुरुष' फॉर्ममध्ये आता ही ब्रह्मांडात क्रिया झाली. **ही 'मूळ बीज यज्ञ' संकल्पना होय.**

ह्या संकल्पनेची प्रचीति मानवी 'पिंडात' सुद्धा ह्याच रेतस् (Semen) उर्ध्वरेत करून सहस्त्रारचक्रस्थानी असलेल्या यज्ञकुंडात आज्य म्हणून वापरता येते व ह्या योगक्रियेने **Transcendental Knowledge** म्हणजे परलोकीचे, अव्यक्त जगातील बीज संकल्पनेचेही ज्ञान प्राप्त करून घेता येते आणि ते खरोखर सत्यज्ञान आहे!!

तेव्हा ''**पिंड ब्रह्मांड ऐक्य**'' ही संकल्पना व समीकरण ह्या विश्वात अचलपणे, अनंतापर्यंत स्थापन केलेले असल्यानेच ना, हे ज्ञान प्राप्त होऊ शकते?

मग ज्ञानाची जी शास्त्रे आज जगामध्ये प्रचलित आहेत, त्या पेक्षा किती श्रेष्ठ पद्धतीची ज्ञानक्रिया व **(Key Concept)** ''**कुंजिका**'' युक्ति आपल्याला वैदिक ज्ञानातून प्राप्त झालेली आहे. हे लक्षात यावे!!

दुसरा आला प्रश्न **सत्याच्या मानप्रक्रियाचा (Standard of proofs)** प्रमाण ज्ञानाचा!! तिथेही, 'ज्ञानाच्या सत्यतेबद्दल' मानवी बुद्धीवर अवलंबून असलेल्या कुठल्याही संस्था, युनिव्हर्सिटी, लॅबोरेटरी, सुप्रीम कोर्ट यांची काय तमा आहे.

जिथे प्रत्येक मानवी जीव ह्या प्रक्रियेने ज्ञान प्राप्त करून त्याची अनुभूती घेऊ शकतो, हेच त्या सत्याचे अंतिम परिमाण आहे व त्याला तुलना नाही? त्याला पर्याय नाही!!

सत्य ज्ञान मिळवण्याच्या प्रयत्नात आता सारे जग कामाला लागले आहे असे जरी मानले तरी त्यांच्या प्रयत्नामध्ये दोन मुख्य वैचारिक दिशा दिसतात. पाश्चात्य, भौतिकवादी विज्ञानाचे प्रयत्न जाहीर आहेत व त्यांना प्रत्येक देशातील राज्य संस्थांचे पाठबळ आहे.

भारतातही ह्याही पाश्चात्य भौतिकवादी पद्धतीच्या प्रयत्नामध्ये वैज्ञानिक गढले आहेत. नुकतेच 'चंद्रयान प्रोजेक्ट', त्यावर शेकडो कोटी रुपये केन्द्र सरकार खर्च करतांना दिसते आहे. पण, तिथे काय सापडले तर 'पाणी' व त्याचा उदोउदो झाला. पण, चंद्राची मुख्य कामगिरी ही 'समुद्राला भरती, ओहोटी जीवसृष्टीच्या मानसिक शक्तिवर प्रभाव आण आध्यात्मिक दृष्टित पृथ्वीवरच्या जीवनाला 'सोमांची' प्राप्ती. ही सुद्धा आहे असा विश्वास भारतीय संस्कृतीत आहे.

या विषयावर केन्द्र सरकारे, राज्यसरकारे व खाजगी संशोधन संस्था यांच्यात अंधारच आहे.

**मग ज्या गोष्टीचा गवगवा केला तो चंद्रयानाचा 'Indian Agenda' कोणता?**

ह्याचा विचार झाला पाहिजे. सत्यज्ञानातही पक्षपाती व व्यापारी व पूर्ण भौतिकवादी दृष्टिकोन बाळगताना, भारताच्या स्पिरीच्यूल वारसा व उद्दिष्टे यांना ही वैज्ञानिक दृष्टि झिडकारताना दिसते आहे.

आणि म्हणूनच हा या लेखनाचा प्रपंच मांडतो आहे. प्रश्न असा पडेल की भारतीय ज्ञानपद्धतीचे असे कोणते वैशिष्टच आहे की, त्याप्रमाणे सत्यज्ञान मिळवण्यासाठी संशोधन व्हावयाला हवे; किंवा आहे ते ज्ञान पुढच्या पिढीकरिता संवर्धन करावयाला हवे?

**प्रत्यक्ष भारतीय घटना काय सांगते? :**

आपण जो जीवनाची उत्पत्ति ह्या विश्वाच्या निर्मीतीतच कशी होते, हा प्रश्न हाताळतो आहे; व त्याचा **'पिंडी ते ब्रह्मांडी', ह्या गुरुकिल्लीने ठाव घेतो आहे,** त्याचे वैशिष्ट्य बघु या. त्यावरून भारतीय ज्ञान पद्धतीचे श्रेष्ठत्व व गुणवत्ता दिसू शकेल. मगच भारतीय घटनेचा

constitution of India ची पक्षपाती अंमलबजावणी लक्षात येईल.

सध्याच्या वैज्ञानिक पद्धतीत केवळ शरीर रचनेचा कोरडा अभ्यासच अभिप्रेत आहे. त्याचे ही व्यापारीकरण चालू आहे. खऱ्या वैज्ञानिक दृष्टिकोनाचे ''Spiritual Audit'', स्पिरीच्यूअल ज्ञान विषयाला लावले जात नाही!!

पण, वैदिक विज्ञान पद्धतीत त्या संशोधनात त्यांतील 'चेतन तत्वाचा शोध' व विचार मुख्य आहे. प्राणी सृष्टीतील इच्छा, द्वेष, सुख, दु:ख ह्यांची उपस्थिती व त्यांचा अनियंत्रित व्यवहार काय चालतो व कोणत्या शक्तीमार्फत चालतो, ह्याचा विचार नाही. जो काही आहे तो जीवनांच्या बीज संकल्पनेच्या मुळाशी जात नसून केवळ 'Behaviourial Science' म्हणजे तो ही स्टॅटिस्टिकल ऑबझरव्हेशन आचरणाच्या आकडेवारीवर आधारून चालला आहे. त्या पहाणीची चौकटही अत्यंत तोकडी व संकुचित आहे. त्यामुळे, त्यातील निष्कर्ष सुद्धा सत्यज्ञानाच्या जवळपास फिरकत नाहीत. ह्यांचा विचारही भौतिक तत्वज्ञान, विज्ञान, भौतिक समाजशास्त्र, भौतिक मानसशास्त्र यांच्या परिसीमेंतच वा मर्यादेतच होतो. ह्या सर्वांच्या मुळाशी जाऊन मानवी फॉर्मच्या बीज संकल्पनेत ह्याची मुळे कोणती आहेत, का आहेत त्यांना कोणती सात्विक कलाटणी देण्याचे संस्कार करावयाला हवेत व त्या संस्कारांची यंत्रणा काय असावी, याचा सर्वांगीण विचार नाही. ''**Trial and Error**'' असेत्याचे स्वरूप व बऱ्याचशा व्यापारी वृत्तीने हा 'संशोधनाचा' व्यवहारी भौतिक उपचार चालतो.

मुख्य म्हणजे हे '**शरीर**' प्राप्त होते ते माता व पिता यांच्यातील **मैथूनाने**, असे दिसले, तरी ते केवळ '**बाह्य शरीर 'सूक्ष्म शरीर' नव्हे**. हे 'सूक्ष्म शरीर' जुन्या जन्मातून संस्कारित होऊन नवीन जन्माच्या वेळी ह्या बाह्य शरीरांत अंतर्भूत होते. याला भारतीय संस्कृतीतील आधार कोणता?

**''माता पितृजं स्थूलं प्रायश: दृतरन्न तथ।।''**

**(सां – ३–७)**

विश्वाच्या सुरवातीला ह्याची 'पुरुष संकल्पना' व नंतर मैथूनी सृष्टिची निर्मीती झाली. तेव्हा हे सूक्ष्म शरीर मातेच्या पोटात पैदा होत नाही, तर त्याचा क्रम वरीलप्रमाणे हे मानवी शरीर ज्याला आपण पिंड म्हणून संबोधले, ते वास्तविक कोणते यंत्र आहे. त्याचे कोणते भाग आहेत व ते काय प्रमुख भूमिका बनवतात? हे प्रश्न भारतीय वैदिक ऋषींनी हाताळले. ह्या प्रश्नांचा रोख सामान्य पातळीवरचा नाही!!

ह्या पिंडाला एक सामान्य प्राणी समजून त्याच्या फक्त प्राणी जीवनाचा संदर्भ असणारी कामे हीच गृहीत धरून केलेला सामान्य पातळीवरचा हा वैज्ञानिक अभ्यास नव्हे तर हा **पिंड** हा या अवाढव्य ब्रह्मांडाची '**एक लहानशी प्रतिकृती**' आहे हे लक्षात घेऊन केलेला अभ्यास.

पण, त्या स्वरूपातही त्या पिंडाकडून काही तरी दिव्य कामे व कार्य व स्वत:च्याच उन्नतीची, उद्धाराची क्रिया होणार आहे, हे जाणून घेऊन मग त्या शोधाला तपस्येने जोडून घेणारा **हा भारतीय अभ्यास आहे!!** निश्चितच, हा **पाश्चात्य भौतिकवादी विज्ञान संशोधकाच्या पेक्षा पुष्कळ मोठ्या उंचीचा आहे.**

कसे ते पाहू व त्यांना त्यांच्या श्रुती ज्ञान, समाधिजन्य ज्ञान व अनुभूती शास्त्राच्या मार्गाने काय उत्तरे मिळाली ती पाहू या.

ह्या ऋषींचे नाव आहे **''दीर्घतमस् औचथ्य.''** ह्या 'ऋषीचा' अधिकार मोठा मानला जातो आणि

त्याच्या नावाने असलेल्या ऋग्वेदीय सूक्ताचे नाव 'अस्यवामीय' (तत्वज्ञान) सूक्त असे आहे. हे अत्यंत दुर्बोध पण अत्यंत गर्भपूण अर्थ असलेले सुक्त मानण्यात येते. त्यातील पहिली ऋचा अशी -

**छंद - १२, १५, २३, २९, ३६, ४१. जननी प्रस्तारपंक्ति, अनुष्दभ्, अवशिष्ट - त्रिष्टुभ्**

**ऋषी : दीर्घतमस औचथ्य, देवता : १-४१ विश्वेदेव**

**''अस्य वामस्य पलितस्य होतुस्तस्य भ्राता मध्यमो अस्त्यश्नः।**
**तृतीयो भ्राता घृतपृष्ठो अस्यामापश्यं विश्पतिं सुपुत्रम।।**

**(ऋग्वेद : १-१६४-१)**

ह्या अत्यंत महत्त्वाच्या ऋचेचे अर्थ लावण्यात, माझ्या दृष्टिने, फार चुका झाल्या आहेत. एकतर त्या निव्वळ भाषा व व्याकरण ह्यांच्या सध्याचा प्राप्त व्याख्यांप्रमाणे अर्थ लावले गेले. त्यांत महामहोपाध्याय चित्रावशास्त्री पण येतात. पण सध्या तो आपला विषय नाही.

मी अनेक अर्थ तपासून खालील अर्थ धाडसाने मांडतो आहे. त्यावर चर्चा व्हावी - जरूर व्हावी तरच **ऋषींची प्रतीकात्मक भाषा** व त्यांनी शोधून काढलेली **गूढ वैश्विक रहस्ये** यांची योग्यता समजेल. हे माझे स्वैर अर्थ लावणे आहे, पण खरी अर्थप्राप्ती देणारे आहे असे पटेल!!

''हे शरीर आहे ते सुंदर आहे पण काळक्रमणामध्ये, कालबद्धतेमुळे वृद्धत्वाकडे जाणारे आहे. या शरीरामार्फत 'यज्ञ' करणारा किंवा अजाणता वैश्विक यज्ञकृती भोगणारा जीव सुखदु:खाचे भोग घेतो आहे.

पण हा पिंड वा शरीर हा **तीन अनादि तत्वांचा संयोग** घेऊन अस्तित्व संभाळणारा प्राणी आहे. प्राणी ह्याचाही अर्थ प्राणाचे अस्तित्व असणारा व त्या सामर्थ्यावर जीवित असणारा आहे.

**ईश्वर (परमात्मा), जीव व प्रकृति,** ही ती **अनादि तत्वे** आहेत. त्यांचा एकमेकांशी संबंध हा बंधूभावाचा आहे म्हणजे प्रेमाचा म्हणून त्यांना **'भ्राता'** ही संज्ञा वापरली आहे.

मग ह्या तीन तत्वांचा कोणता खेळ (**यज्ञ?**) चालला आहे? पण, त्या अगोदर ह्या तीन भ्राते (खेळाडूंची) वैशिष्ट्ये सुद्धा हा ऋषी सांगून टाकतो. त्यातला 'जीव' आहे तो 'ज्ञाता' आहे. हा ज्ञान व इच्छा शक्तीची साधने असणारा, पण ह्या जगात भोग घेणारा. अश्न: = खानेवाला भोक्ता. सुख व दु:ख व अनेक सांसारिक व्याधी भोगणारा व त्याचबरोबर ज्ञानाची प्राप्ती करून, ती जतन करणारा आहे. थोडक्यात, एक उत्तम विद्यार्थी आहे.

**'प्रकृती' :**

**'ईश्वर'** हा तटस्थ पण विशेष शक्ती असणारा खेळाडू आहे. 'घृत पृष्ठ' म्हणजे तिसरा खेळाडू जो आपल्या पाठीवर विशेष शक्ति असलेला आहे. इथे **घृत म्हणजेच अग्नि. 'घृतं' तेजस शक्तिचा पर्याय आहे. वैदिक 'अग्नि' हा Transforming Agent आहे.** म्हणजे मूलगामी बदल घडवून आणणारा आहे. आणि प्रकृति मध्ये ज्या शक्तिचा संचार आहे तो **'सत्प प्राणांचा' आहे (पंचप्राण + मन + बुद्धी) व त्याचे सत्पवर्गी प्रजापालक रूप** मध्ये विकसित होणे आहे.

**प्रकृती ही परिवर्तनशील आहे :**

हा अर्थ लावण्याचा प्रयत्न, एका सहानुभूतीपूर्वक भूमिकेत व पूर्णत: आदरपूर्वक करावा लागतो, कारण,

ही ऋचा ज्या कोणी **संस्कृत भाषेमध्ये सांगितली व गायली (सामवेद)**, त्याला त्या भाषेच्या व त्यांतील शब्दामार्फत ज्ञात होणाऱ्या संज्ञाच्या अर्थ प्राप्ती मर्यादा आहेत. तसेच त्यातील नाते संबंध जाणून घेण्यासाठी ज्या सामाजिक नात्यांचा संबध येतो त्या संज्ञांचा, त्या वेळचा अर्थ अभिप्रेत धरावा लागतो. जसा 'भ्राता' ह्यात बंधुभाव व प्रेम गृहीत धरावयाला लागते, पण कलीयुगांत भाऊला प्रॉपर्टीचा वाटेकरी म्हणून शत्रू मानला जातो आहे व भावाभावात 'भाऊबंदगी' गृहीत ही नित्य भावना आहे. तरी देखील ऋषीच्या 'भ्राता' हा शब्द योजून ह्या तीन खेळाडूंच्या भावसंबंधाचा परिचय पुढच्या युगांमधील मर्त्य मानवाला देण्याचा अपूर्व प्रयत्न होय!

तसेच, '**पलित**' म्हणजे वृद्ध व **वृद्धत्वाकडे झुकणारा** मानवी शरीर अजूनही ह्या वृद्धत्वाच्या नियमाला अपवाद नाही. कालबद्ध आहे!!

आता कदाचित ह्या '**समाधिजन्य**' **Intutive Knowledge** चा कथित अर्थ ध्यानात यावयाला मदत होईल. मग काय आहे ह्या वैदिक श्रृती ज्ञानाचे महत्त्व?

ज्या पिंडाचा अभ्यास करून आम्हाला ब्रह्मज्ञान व ब्रह्मांड ह्यांचे ज्ञान प्राप्त होणार आहे, त्या पिंडातील ३ भागीदार व त्यांचे परस्पर संबध एका ऋचेत सांगून टाकले आहेत. त्याचे '**Role**' अवतार कार्य सुद्धा थोडक्यात दर्शवले आहे. **ह्या 'अस्थ वामीय सुक्तात' केवळ १२ ऋचा आहेत.**

ह्या ऋषीचे नाव '**दीर्घतमस औचथ्य**' असे आहे. पण, ह्याही बाबतीत वेदाचे 'अपौरुषत्व' दृष्टिस येते!! ह्या ऋषीचे नांव हे एखाद्या मानवी शरीराचे व्यक्तिमत्त्व नसून ह्या नावाने ज्या गूढ आध्यात्मिक तत्वाचा बोध होऊ शकेल तो मार्ग दाखविण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे नाव सुद्धा एक 'दिशा, मार्ग' म्हणजे '**Sign Post-Board**' आहे. प्रत्येक ऋचेची 'देवता' सांगितली जाते. (त्याचा ही) 'देवता' याचा अर्थ '**आध्यात्मिक विषयाचे नाव**' '**Subject matter**' असा आहे. शिवाय '**छंदाचे**' ही नाव न चुकता लिहीलेले (सांगितले) जाते. हे तर पाश्चात्य तत्वज्ञानात सापडणेच कठीण आहे.

**ज्ञानाचे संक्रमण किंवा वहन ज्या शक्तिने (Energy) होते त्या शक्तिच्या छंदाची (Frequence, Scale, Harmony, Musicology) हे सांगणारे किंवा सूचविणारा संदर्भ!! कारण, कोणतेही ज्ञान हे छंदबद्ध असते** व त्या छंदाच्या आवाहनाने किंवा गाण्यानेच त्याचे सर्वांगिण (Comperhensive) स्वरूप ज्ञात होते, असा वैदिक ज्ञानाचे (standard) परिमाण व आग्रह आहे हे तर अतुलनीय व अद्वितीयच आहे!!

या गोष्टींचे पूर्णांगाने व पूर्णाशाने महत्त्व इथल्या फारच थोड्या विद्वानांना आहे. त्यामुळे भगवद्गीतेत जरी **भगवान कृष्ण म्हणतात की मी वेदांमध्ये 'सामवेद' आहे** तरी 'भ. गीतेच्या' चाहत्यांनाही 'सामवेदाचे पठण', संवर्धन वा संशोधन व्हावे, असे वाटत नाही!!

ही अत्यंत खेदाची गोष्ट आहे!! तेव्हा ह्या ऋषीच्या नावाचे रहस्य सुद्धा मी योग्य वेळी सांगिनच!!

आपल्या मुख्य विषयाकडे आता पुन्हा वळू या. 'सत्य ज्ञान प्राप्त करण्यासाठी, अल्पायुषी, मर्त्य मानवाला, त्याच्या 'पिंडामध्ये', त्याच्या फॉर्मला पेलवतील व अशा 'Softwares stored form' क्रिया, गोठवलेल्या किंवा 'निद्रित' अवस्थेत, त्याच्या '**पूर्व स्मृतीत**' ठेवण्यात आल्या आहेत.

जसे '**कुंडलिनी योग**' होय. ह्या कुंडलिनीची शक्ति त्याच जातीची आहे कीं जी '**सृष्टि निर्मीती**'

(पान क्र. ३१ वर)

# आदरांजली

१८ मार्च श्री. विश्वनाथ (उपाख्य बंडोपंत) शेंड्ये यांचा वाढदिवस. त्या दिवशी त्यांच स्मरण होणे अत्यंत स्वाभाविक आहे. एक स्नेही, मार्गदर्शक आणि सल्लागार या नात्याने लेख रूपाने त्यांना वाहिलेली ही आदरांजली – संपादक

''आपलं भावी आयुष्य निरोगी, निरामय जावो! आपणाला दीर्घायुष्य लाभो!'' अशा शुभेच्छा दर वाढ दिवसाला मित्र, नातेवाईक, हितचिंतक यांना आपण नेहमी देत असतो. त्यानुसार गतवर्षी १८ मार्च ०९ रोजी बंडोपंतांच्या वाढदिवसाचे वेळी त्यांना मी अशा शुभेच्छा दिल्या, त्यावेळी पुढील वर्षी ते या जगात नसतील आणि त्यांना शुभेच्छा देण्याऐवजी बंडोपंतांचं पुण्यस्मरण करून हार घातलेल्या त्यांच्या फोटोला नमस्कार करण्याची वेळ येईल ही कल्पनाच मनाला अस्वस्थ आणि दुःख देणारी असणार आहे, असं सुतरामही वाटलं नव्हत. मात्र नियतीच्यापुढे आपण काहीच करू शकत नाही हेच खरं.



''पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा!'' खरंच मानवीजीवन किती क्षणभंगुर आणि अस्थिर आहे याची त्याला कल्पना नसते. जून-जुलै ०९ चे सुमारास साधे मलेरियाचे निमित्त झाले. त्यावेळी बंडोपंतांना ब्लड कॅन्सरसारखा दुर्धर आणि जीवघेणा रोग होईल असे स्वप्नातदेखील वाटल नव्हत. ७२ वर्षांचे आयुष्यात किरकोळ आजार सोडता बंडोपंत विशेष आजारी आहेत असं कधीच ऐकलही आणि पाहिलही नव्हतं. मात्र नोव्हेंबर ०९ पासून त्यांची प्रकृती कमालीची खालावत गेली, डॉक्टरांनी प्रयत्नांची शिकस्त केली, कुटुंबियांनी अथक परिश्रम आणि 'सेवा-सुश्रुषा केली.' मात्र प्रतिसाद दिवसेंदिवस कमी होत गेला आणि रविवार दि. २४ जाने. १० रोजी पहाटे ६.३० च्या सुमारास त्यांची प्राणज्योत अनंतात विलीन झाली. त्यांच्या निधनाची दुःखद वार्ता मी आईचं नाशिक तीर्थक्षेत्री अस्थि विसर्जन करून येतच होतो, तोच समजली. अस विपरीत घडणार याची कल्पना असली तरी बातमी मनाला विलक्षण चटका लावणारी होती. मनस्वी वाईट वाटलं. एक प्रसन्न, सदा हसतमुख, अभ्यासू आणि कार्यतत्पर व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्या आड गेलं. अंत्ययात्रेप्रसंगी विविध संस्थांमधील अनेक मान्यवर मंडळी बंडोपंतांना अखेरचा निरोप देण्यासाठी वैकुंठभूमीत जमली होती. अनेक संस्था पदाधिकाऱ्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

१८ मार्च हा बंडोपंत शेंड्यांचा वाढदिवस. या दिनाचं औचित्य साधून एका स्नेह्याला, मार्गदर्शक, सल्लागार याला भावांजली म्हणून प्रस्तुत लेख लिहिला आहे. खरतर त्यांच्या अमृतमहोत्सवी सोहळ्याचे वेळी तो लिहिण्याचा योग आला असता तर किती चांगलं झाल असत. परंतु विधिलिखित असंच होतं.

सुमारे चाळीस वर्षांपूर्वी माझे मेव्हणे श्री. अरुण ओगले एक वर्षासाठी बंडोपंताचे मोठे बंधू यांच्या मालकीच्या घरात रहावयास आले असता बंडोपंतांशी माझा प्रथम परिचय झाला. खरंतर माझ्यापेक्षा नऊ वर्षांनी ते मोठे होते. परंतु त्यांच्या स्वभावामुळे आमचे सूर जुळले. ओळखीचं रूपांतर स्नेहामध्ये कधी झाले ते कळलेच नाही. पुढे असच गप्पांच्या ओघात पूर्वायुष्याची माहिती त्यांच्याकडून समजली.

शेंड्ये कुटुंब मुळचे गणपतिस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या गणपतीपुळ्याचे. गावात शेंड्येशास्त्री म्हणून कुटुंबाची ओळख होती. वेदशास्त्र संपन्न आणि दशग्रंथी

ब्राह्मण म्हणून सुपरिचित आणि विद्वान असलेले गणेशशास्त्री हे बंडोपंतांचे चुलते. बंडोपंतांचे प्राथमिक शालेय शिक्षण गणपतीपुळे येथेच झाले. मात्र पुढील शिक्षणाची तेथे सोय नसल्यामुळे ते पुणे येथे आपल्या चुलत्यांकडे शिकावयास आले. सख्खे व चुलत बंधू एकत्रच राहत असल्यामुळे कुटुंब मोठं. आर्थिक परिस्थिती बेताची किंबहुना गरीबीचीच; त्यामुळे वार लावून बंडोपंतांच शिक्षण झालं. पुण्याचे प्रसिद्ध उद्योजक चितळेबंधू यांच्याशी त्यांचे जवळचे आणि जिव्हाळ्याचे संबंध होते. काही वर्षे त्यांच्याकडेही बंडोपंतांच वास्तव्य होतं. वडील बंधूंचे अचानक निधन झाल्यामुळे Earn and Learn या उक्तीनुसार त्यांनी दुकान चालवायला घेतले. दुकानाकरिता प्रसंगी पाठीवरून गोणी वाहण्याचे, पुड्या बांधण्याचे, घरोघरी सामान पोहोचविण्याचे कामही बंडोपंतांनी केलं. परंतु त्यात कधी कमीपणा मानला नाही. तेवढीच आपल्याकडून संसाराला मदत हीच त्यामागील भावना. पडेल ते काम करत वाणिज्य शाखेची पदवी उत्तम गुण मिळवून त्यांनी संपादन केली. पुढे वकिलीची परीक्षाही ते उत्तीर्ण झाले. सनद घेतली. खरं तर त्यांना वकीलीच करावयाची होती. परंतु आर्थिक स्थिती ओढाताणीची त्यामुळे वकिली व्यवसाय चालणार कधी आणि त्यातून उत्पन्न मिळणार कधी आणि किती, सगळेच अनिश्चित. त्यामुळे नोकरी करण्याचं नक्की झालं. नोकरी निमित्ताने मोठे बंधू शेंड्ये सर यांच्याकडे ते रहावयास आले. ठाणे नगरपालिका, मुंबई युनिव्हरसिटी, सॉलिसिटर फर्म येथे काही वर्षे नोकरी केल्यानंतर बेलापूर पट्टीतील टेरीन व्यवसायात अग्रणी आणि नामवंत असलेल्या कॅफी कंपनीत (पुढे ती रिलायन्सने घेतली) सेक्रेटरीअल डिपार्टमेंट सारख्या महत्त्वाच्या डिपार्टमेंटमध्ये नोकरी केली. मुळातच हुशार असल्यामुळे त्या ठिकाणी स्वत:चा ठसा त्यांनी निर्माण केला. परंतु स्वाभिमानीवृत्ती मॅनेजरची चुकीची धोरणं आणि लायक असूनही डावलेलं प्रमोशन त्यामुळे पंचवीस वर्षांचे नोकरीनंतर त्यांनी स्वेच्छानिवृत्तीचा निर्णय घेतला. मात्र विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे कंपनी क्लोजर आणि अमाल्गमेशनवेळी या डिपार्टमेंटमधील तज्ज्ञ आणि अनुभवी म्हणून एक वर्षांसाठी कंपनीने त्यांना मुद्दाम बोलावून घेतलं होतं.

सामाजिक कार्याची मुळातच आवड असल्यामुळे एक कार्यकर्ता म्हणून सामाजिक कार्यात त्यांनी स्वत:ला वाहून घेतलं. ठाणे जिल्हा बास्केटबॉल संघटना, श्री समर्थ सेवक मंडळ, प्राच्यविद्या अभ्यास संस्था, श्री कौपीनेश्वर मंदीर ट्रस्ट, ठाणे पत्रकार संघ अशा विविध संस्थामधून त्यांची निरलस व सेवा वृत्तीने एक स्वयंसेवक म्हणून कार्य केले. परंतु कुठेही पदाची आणि प्रसिद्धीची हाव धरली नाही.

ठाणे जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे आठ वर्षे खजिनदार म्हणून त्यांनी काम सांभाळले. अनेक स्पर्धांचेवेळी पंच आणि तज्ज्ञ म्हणून त्यांना निमंत्रित केले जात असे. सर्वसामान्यांना समजावी या उद्देशाने बास्केटबॉल खेळाची इंग्रजी नियमावलीची मराठी आवृत्ती त्यांनी प्रकाशित केली. आज संदर्भासाठी तिचा उपयोग विविध बास्केटबॉल संघटना करताना दिसतात.

संस्कृत भाषेचा व्यासंग आणि अधिकार, तसेच देवनागरी, मोडी लिपीचा अभ्यास व माहिती असल्यामुळे डॉ. विजय बेडेकर यांच्या प्राच्यविद्या अभ्यास संस्थेशी त्यांचा संबंध आला तो शेवटपर्यंत टिकून होता. डॉक्टरांचा बंडोपंतावर विशेष लोभ आणि स्नेह होता. त्यांच्या कृतीतून, वागण्यातून तो जाणवत असे. या संस्थेच्या ग्रंथालयात असलेल्या आणि नवीन येणाऱ्या प्रत्येक ग्रंथांविषयी बंडोपंतांना उत्तम माहिती आणि ज्ञान होतं. डॉक्टरेट करणारे विद्यार्थी अथवा अनेक अभ्यासूमंडळी त्यांच्याकडे सल्ला, मार्गदर्शन आणि संदर्भासाठी आवर्जून येत असत.

पत्रकारितेचं ज्ञान आणि अभ्यास असल्यामुळे त्यांनी मुक्त पत्रकारिताही केली. विविध वृत्तपत्रे, मासिकं,

साप्ताहिक यातून त्यांनी लिखाणही केलं. त्यांचा कवितासंग्रही प्रकाशित झाला होता. जांभुळपाडच्या गणपती देवस्थानच्या उजव्या सोंडेच्या सिद्धहस्त लक्ष्मी आणि दशभुजा असलेल्या गणपती विषयीची माहिती त्या मंदिराचे प्रमुख विश्वस्त आणि सर्वेसर्वा असलेले श्री. नाना बोडस यांना हवी होती. बंडोपंतांनी तपशीलासह लेख स्मरणिकेसाठी दिला. श्री कौपीनेश्वर मंदीर ट्रस्टसाठी म्हणूनही त्यांनी काम केलं.

वरील सर्व सामाजिक संस्थापेक्षा श्री समर्थ सेवक मंडळाच्या कार्यात त्यांचा विशेष सहभाग होता. संस्थेच्या श्री हनुमान व्यायाम शाळा, कै. नी. गो. पंडितराव स्मृती वक्तृत्व स्पर्धा, शिशुज्ञान वर्धन शाळा, शिवसमर्थ विद्यालय अशा सारख्या विविध उपक्रमातून पदाधिकारी, सभासद म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका त्यांनी बजावल्या होत्या. विशेषत: श्री हनुमान व्यायाम शाळेची अनेक वर्षे धुरा समर्थपर्ण आणि यशस्वीरीत्या त्यांनी सांभाळली होती. या योगदानाबद्दल श्री हनुमान व्यायाम शाळेच्या अमृत महोत्सवी सोहळ्याचे वेळी सन्मानपूर्वक आणि आदरपूर्वक स्मृतिचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आलं होतं. कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेसंबंधात त्यांच योगदान होत. स्पर्धेचे उत्स्फूर्त विषय असोत अगर नियोजित, ते विषयांची यादीच देत असत.

Respect is commanded and not be Demanded शेंड्ये करीत असलेल्या विविध संस्थांमध्ये त्यांच्याविषयी आदर आणि आपुलकीची, स्नेहाची भावना होती हे स्वानुभवावरून सांगू इच्छितो. कॅडबरी कंपनीच्या काही कामानिमित्त ते माझ्याकडे आले होते. कामासंबधी आमची चर्चा सुरू असता पर्सनल मॅनेजर श्री. हर्ष भोसले अचानक बाहेर आले आणि त्यांनी बंडोपंतांना पाहिलं. पाहताच क्षणी श्री. हर्ष भोसले यांनी श्री. शेंड्ये यांच्या पायाला हात लावून नमस्कार केला. मी म्हटलं, श्री. शेंड्येसरांना आपण कसे ओळखता? त्यावर श्री. हर्ष भोसले यांनी सांगितले ''बंडोपंत बास्केटबॉलचे माझे गुरू होते.'' श्री हनुमान व्यायाम शाळेंतील त्यांच्या हाताखाली तयार झालेले विद्यार्थी त्यांना नमस्कार करीत असल्याचं मी अनुभवलंय. मला खात्री आहे ज्या ज्या ठिकाणी त्यांनी काम केलं त्या त्या ठिकाणी बंडोपंतांविषयी अशीच आदर भावना होती.

''सांगेन युक्तीच्या गोष्टी चार!'' विविध संस्थामधून त्यांनी काम केलं मात्र कुठेही प्रसिद्धी, पदाची हाव धरली नाही. किंबहुना प्रसिद्धीपासून चार हात लांब राहणंच ते पसंत करत असत. त्यांची भूमिका कार्यकर्त्याची, स्वयंसेवकाची होती. आजच्या जमान्यात अशी माणसं मिळणं अतिशय दुर्मिळ. लेख अथवा विशेष पत्र लिहितेवेळी एखाद्या शब्दाचा अर्थ मला हवा असेल, इंग्रजी स्पेलींग हवं असेल अथवा कोटेशनसाठी संस्कृत सुभाषित, इंग्रजी फ्रेज हवी असेल मी त्यांच्याकडे विचारणा करीत असे, त्यांच मार्गदर्शन घेत असे. मला खात्री आहे माझ्यासारखा अनेकांचा असाच अनुभव असणार!

'विद्वान सर्वत्र पूज्यतें!' मराठी, इंग्रजी, संस्कृत या तीनही भाषांवर त्यांच प्रभुत्व होतं. विशेषत: संस्कृतचा त्यांचा गाढा व्यासंग होता. आमच्या कंपनीची अनेक करारांची, विविक्षित आणि क्लिष्ट पत्रांचे मराठी अनुवाद मी त्यांच्या कडून करून घेत असे. प्रमुख पाहुणे अथवा मान्यवरांनी दिलेल्या ओळखीचा मराठी अनुवाद ते सहजपणे करीत असत. संपूर्ण पौरोहित्य त्यांना येत असे. अनेक स्पर्धांमधून परीक्षक म्हणूनही त्यांनी काम पाहिलं. मी लिहिलेल्या लेखांसंबधी समीक्षक या नात्याने त्यांचा अभिप्राय जरूर घेत असे. अनेक प्रतिष्ठित आणि मान्यवर मंडळींशी त्यांचा निकटचा आणि स्नेहचा संबध होता. त्यांच्या शोकसभेवेळी याचा अनुभव आला. मात्र इतकं असूनही कुठे बडेजाव, मी पणा त्यांनी कधीच केला नाही. बंडोपंतांना चिडलेलं, रागावलेलं मी फारसं

कधी पाहिल नाही. ॲडजस्टमेंटचा स्वभाव, पटकन कुणाला टाकून बोलणार नाही, वृत्ती सात्विक, दुसऱ्याला मदत करण्याचा स्वभाव, मेहनत करण्याची तयारी, तिरकस, कटू बोलणं नाही या सर्व गुणांमुळे त्यांच सर्वांशी जमत असे.

बंडोपंतांच्या दु:खद निधनाने वरील सर्वच संस्थांना त्यांची उणीव, अनुपस्थिती जाणवल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्यासारख्या निरलस आणि सेवावृत्तीने, तळमळीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांमुळे, स्वयंसेवकांमुळे सामाजिक संस्था कार्य करू शकतात. आणि टिकून आहेत, हे नमूद करावेच लागेल.

मुलगा डॉक्टरेट असून कॅनडात नोकरीला आहे. स्नुषा, दोन्ही मुली, जावई विद्याविभूषित असून उत्तम संसार करीत आहेत. नातवंडे आहेत. बहात्तर वर्षांच्या वाटचालीत पत्नीचा फार मोठा वाट होता हे विसरून चालणार नाही. तिच्या सहकार्यामुळे इतकं विविधांगी कार्य बंडोपंत करू शकले. सदरहू लेख लिहिताना बंडोपंतांचा हसतमुख चेहरा, त्यांच वागणं, बोलणं, चालणं, प्रसंगी रागावणं, त्यांचा पेहराव सारं सारं मन:पटलावर येत होतं आणि त्यांच्या आठवणीने मी अंर्त:मुख झालो होतो.

'मरावे परी किर्ती रुपी उरावे!'' या श्री समर्थ रामदासांच्या वचनानुसार बंडोपंत, आपण जरी इहलोकातून निघून गेला असलात तरी आपल्या कार्यामुळे आपण सदैव आमच्या स्मरणात राहणार आहात. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो ही श्री परमेश्वरचरणी प्रार्थना करतो आणि ही भावसमुनांजली आपल्या चरणी अर्पण करतो.

**श्री. सुरेंद्र लागू**
२ / पहिला मजला, यमुना सोसायटी,
गोविंद बच्चाजी रोड, चरई, ठाणे (प.)
दूरध्वनी – २५३४९३४१

●●●

(पान क्र. २७ वरून)

**भारतीय संस्कृती – बीज, मॉडेल व साधना**

**करणारी 'आदिशक्ति' – चैतन्य पूर्ण, इच्छाशक्ति, ज्ञानशक्ति व क्रिया शक्ति ही वैशिष्ट्ये असणारी.** तिला जागृत करून मेंदूपाशी ('सहरचारचक्रापाशी') नेवून, 'अग्नि' जागृत करून एक '**आत्मयज्ञ**' केला की ज्या विषयांची अनुभूती प्रकृतीच्या सहाय्याने व माध्यमातून जीवाने ह्या संसारामध्ये घेतली, तिचे भाषांतर व रूपांतर (Translation व Conversion) एका अनादि चिरंतन स्मृतीमध्ये होते आणि हा ठेवा त्या, जीवात्म्याचा आपसूकच 'अवयवी भाग' बनतो. तो इतर जीवात्म्यांना (Social Soul) 'स्कीम मार्फत' महायोगी अरविंद यांनी सांगितलेल्या प्रक्रियेने, प्रगत होतो. ह्या आत्मसंस्काराची ओढ जीवात्मा जन्मोजन्मी बाळगून जन्माला येतो. ह्या पृथ्वीवर त्याची ही Aspiration जागृती व कृती झाली तर तो 'उषेचा उदय' होय. हे उषा सुक्तात आहे.

तेव्हा, थोड्याश्या संक्षिप्तपणे ही भारतीय संस्कृतीतील अद्वितीय सामूग्रीचे वर्णन मी '**यथाशक्ति**' केले आहे. त्याचे पुढील भाग पुढच्या दिशाच्या अंकात पाहू या.

।।हरि ॐ।।

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाईल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यामिक विभाग

❖ 'मराठा मंडळ' पाचपाखाडी ठाणे तर्फे आयोजित 'लोकनृत्य स्पर्धेत' आठवीच्या विद्यार्थिनींनी सादर केलेल्या 'राजस्थानी लोकनृत्यास' १२०० रु. चे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक व प्रमाणपत्र प्राप्त झाले.

❖ 'एकथा कल्यरल अकादमी' तर्फे भरविण्यात आलेल्या 'एकता सांस्कृतिक महोत्सव २०१०' मध्ये राज्यपातळीवरील समूह नृत्य स्पर्धेत 'राजस्थानी नृत्यास' तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

❖ शनिवार दि. ९ जानेवारी रोजी श्री. अच्युतराव गोडबोले यांचे 'माझ्या पुस्तकाची वाटचाल' या विषयावरील व्याख्यान ८ वी ते १० वी साठी आयोजित करण्यात आले.

❖ ऋजुता नयन काबाडी (५अ) हिची ठाणे जिल्हा गणित अध्यापक मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या 'गणित प्रज्ञा' परीक्षेसाठी निवड झाली.

❖ स्काऊट-गाईड उपक्रमांतर्गत 'खरी कमाई' महोत्सव २००९-१० दि. ७ व ८ जाने.' रोजी साजरा करण्यात आला.

❖ रामकृष्ण मठ, खार आयोजित वक्तृत्व स्पर्धेत प्रणिता काळभोर (७ अ), स्नेहल पाटील (७ ड) यांना पारितोषिक प्राप्त झाले.

❖ टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे आयोजित संस्कृत द्वितीय परीक्षेत प्रणिता काळभोर (७ अ) ही प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली असून ती सूर-वाणी-ज्ञान मंदिरात ठाण्यात सर्व प्रथम आली.

❖ 'सुलोना संस्कृत स्थानम्' या संस्थेतर्फे आयोजित भगवद्गीता अध्याय १२ वा पाठांतर स्पर्धेत पाचवीतील मृणाली भोळे, सायली महाडीक, तपन जोशी, शुभम् पवार, मनिष राऊत व रोशनी दिघे यांना रोख बक्षिसे प्राप्त झाली.

❖ 'ग्रंथाली' च्या वाचक दिनानिमित्त आयोजित 'नोबेल नगरीतील नवलस्वप्ने' या कार्यक्रमात ८ वी च्या विद्यार्थ्यांनी डॉ. स्टॅनले प्रुसिनर यांना १९९७ साली मिळालेल्या नोबेल पुरस्काराच्या निमित्ताने श्री. सुधीर थत्ते व सौ. नंदिनी थत्ते यांनी लिहिलेल्या 'कायापुरीतील घुरखोरी' या पुस्तकावर आधारित नाटक सादर केले. त्याबद्दल त्यांना पुस्तक भेट म्हणून मिळाले.

❖ 'ग्रंथाली' तर्फे आयोजित 'गीत-रामायण' कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी गीत रामायणातील दोन गाणी सादर केली. त्यांनाही 'ग्रंथाली' तर्फे पुस्तके भेट मिळाली.

❖ स्टार प्रवाह या दूरदर्शन वाहिनीवर 'कुलस्वामिनी' या मालिकेत निखिल चव्हाण (६ इ) हा भूमिका सादर करीत आहे.

❖ 'लोकमत कात्रण स्पर्धेत' सृष्टी लांगी (५ ड) प्रथम क्रमांक, सागर पिंगळे (६ ड) द्वितीय व शिवानी रामाणे (७ क) यास तृतीय क्रमांक प्राप्त झाला.

❖ दूरदर्शनवरील 'स्टार माझा' या वाहिनीवर 'मुलांच्या विश्वात' या कार्यक्रमात पुढचा कार्यक्रम युनिसेफचे शिक्षक मा. श्री. राजीव तांबे सादर करीत आहेत. शाळेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून या कार्यक्रमाचा शुभारंभ शाळेपासून झाला. यात बालक-पालक-शिक्षक यांच्याशी विविध प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधला.

❖ शासकीय चित्रकला परीक्षा (एलिमेंटरी व

इंटरमिजीएट) सप्टें. २००९ चा निकाल लागला असून शाळेतील एलिमेंटरी परीक्षेचा निकाल ९४% तर इंटरमिजीएट परीक्षेचा निकाल १००% लागला आहे.

❖ 'आयुष्य फुलताना नको ताणतणाव' या मुंबई दूरदर्शन केंद्राच्या सह्याद्री वाहिनीवरून शुक्रवार दि. १५ जाने. रोजी झालेल्या या कार्यक्रमात मा. मुख्या. सौ. उषा कळमकर, पालक सौ. काळभोर व सौ. झाडकर, सौ. म्हात्रे, विद्यार्थीनी आदींचा समावेश होता.

❖ मँगो बाईटस् तर्फे घेण्यात आलेल्या प्रश्नमंजूषा स्पर्धेत विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली. ही पारितोषिके त्यांच्यातर्फे शालेय चित्रकला स्पर्धेतील पुढील विद्यार्थ्यांना मिळाली. मानसी शेटचे (७ ब) प्रथम, सिद्धेश शिंदे (७ ड) द्वितीय, शामल यादव (६ इ) तृतीय, ऋषिकेश शिंदे (८ अ) उत्तेजनार्थ, सर्वेश मांजरेकर (५ अ) उत्तेजनार्थ.

❖ रविवार दि. ३१ जाने. रोजी सकाळी ९ ते १०.३० या वेळात आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवरील 'गंमत-जंमत' कार्यक्रमात 'अदिंबाच्या बेटावर' हे नाटक सादर झाले. त्यात श्रीहरि मुळगुंद (८ अ) याने वैदुंबा ही व्यक्तिरेखा सादर केली.

❖ श्री आनंद भारती समाज, चेंदणी कोळीवाडा, ठाणे यांच्या शतकमहोत्सवी वर्षानिमित्त झालेल्या एकेरी नृत्य स्पर्धेत २५००/- रु. चे बक्षीस व ओंकार मित्रमंडळ, नौपाडातर्फे घेण्यात आलेल्या सार्वजनिक माघी गणेशोत्सव ऐकेरी नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक तसेच साईकृपा माघी गणेशोत्सव यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात एकेरी नृत्य स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक कु. प्रिया टिपाले (९ ब) हिने पटकावले.

❖ सेठ प्रफुल्ल पटेल पब्लिक इंग्लिश स्कूल कल्याण आयोजित इंटर स्कूल फेकोशि कप कराटे चॅम्पियनशिप आयोजित वर्ल्ड कोशि शोटोकन कराटे ऑरगनायझेशन तर्फे घेण्यात आलेल्या कराटे स्पर्धेत अथर्व बेडेकर (८ क) याला सुवर्णपदक व प्रशस्तिपत्रक मिळाले.

❖ III NSKF South East Asian Karate do Campionship तर्फे घेण्यात आलेली कराटे स्पर्धा दि. २३ व २४ जाने. १० रोजी प्रियदर्शनी इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियम, मुंबई येथे घेण्यात आली. सदर स्पर्धेत कैलास पाटील (७ ब) याला रौप्य आणि कांस्य पदक प्राप्त झाले.

❖ 'ठाणे वैभव' तर्फे आयोजित 'शिका आणि जिंका' या स्पर्धेत संदेश आवडे (९ ब) यास पदक व प्रशस्तिपत्रक प्राप्त झाले. कार्यक्रमास पितांबरीचे मा. श्री. प्रभुदेसाई, मुख्या. सौ. कळमकर प्रमुख अतिथी होते.

❖ २६ जाने. प्रजासत्ताक दिनानिमित्त विद्या प्रसारक मंडळाच्या ए. के. जोशी विद्यालयात सौ. मीरा लिमये यांनी स्वा. सावरकरांचे चरित्रकथन केले.

❖ ठाणे महानगरपालिका आणि जिज्ञासा ट्रस्ट, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने ज्ञान-विज्ञान महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास ९ अ, क चे विद्यार्थी उपस्थित होते. तसेच ज्ञान-विज्ञान महोत्सव प्रदर्शनाचा इ. ८ क च्या विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

❖ इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांना समाजसेवा हा विषय कृतीतून समजण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या मतिमंदांच्या 'जिद्द' या शाळेला ८ वीच्या गटाने भेट दिली.

❖ 'मी मराठी' आपल्या माणसांची आपली वाहिनी तर्फे 'खाद्यजत्रा' या कार्यक्रमात सौ. संपदा जोगळेकर-कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले त्यात शुभंकर उतेकर (९ इ) यास पारितोषिक मिळाले.

❖ रोटरी क्लब ऑफ ठाणे तर्फे न्यू इंग्लिश स्कूल ठाणे येथे आयोजित वॉलपेंटींग स्पर्धेत ८ वी तील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्याला श्री. कोळी व सौ. कुष्टे यांनी मार्गदर्शन केले.

❖ ऑल महाराष्ट्र ओपन कराटे चॅम्पियनशिप, ठाणे तर्फे दि. ३१ जाने. रोजी निर्मला निकेतन हॉल, वर्तकनगर, ठाणे येथे घेतल्या गेलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत अंकिता दुधे (७ ब) हिला काथाज् व कुमिथेज् मध्ये रजत व टिम काथाज् मध्ये कांस्य पदक प्राप्त झाले.

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (पूर्व प्राथमिक विभाग)

**'आढावा – दुसऱ्या सत्राचा' :**

दिवाळी सुट्टी संपवून नव्या उत्साहाने सर्व शिक्षक व मुले शाळेत आली. दुसऱ्या सत्रात अनेक उपक्रमांची रेलचेल असते. याच उपक्रमांची ही थोडक्यात माहिती–

१) *फॅन्सी ड्रेस* : १३ नोव्हे. रोजी फॅन्सी ड्रेसचे आयोजन करण्यात आले होते. ज्युनियर के. जी. मुलांना फळे, फुले, भाज्या, पक्षी, प्राणी तर सीनीयर के. जी. च्या मुलांना पौराणिक पात्र, विविध व्यावसायिक, राष्ट्रीय नेते, कुटुंबातील व्यक्ती, प्रादेशिक पारंपारिक वेशभूषा हे विषय यासाठी देण्यात आले होते. मुलांना वेगवेगळ्या वेशभूषेत बघताना फारच गंमत वाटत होती.

२) *सहल* : सिनीयर के. जी.च्या मुलांना २० नोव्हें. रोजी बाळकुंम येथील अग्निशमन दलाचे मुख्य कार्यालय तसेच जवळच असलेली ठाणे महानगरपालिकेची 'ठाणे आर्ट गॅलरी' दाखवण्यात आली. आमच्या शाळेतील पालकांनी याबाबतची रीतसर परवानगी काढण्यात मदत केली. अग्निशमन दलातील अधिकाऱ्यांनी मुलांना त्यांच्या गाड्या, वापरण्यात येणारी साधने दाखवली. नंतर आग विझवण्याची प्रात्यक्षिके दाखवली. मुलांना ही प्रात्यक्षिके बघण्यात फारच मजा वाटत होती. अंदाजे ११० मुलांनी या सहलीचा आनंद लुटला.

ज्युनियर के. जी. च्या १०० मुलांना ओवळा येथील 'श्रद्धा गार्डन्स्' येथे सहलीला नेण्यात आले. श्रद्धा गार्डन्स्मध्ये मुलांनी खेळ खेळले, घसरघुंडी, झोपाळा यावर बसून मनसोक्त आनंद लुटला. बदक, कोंबडी, ससा, कुत्रा असे विविध प्राणी तसेच अनेक प्रकारची झाडे मुलांनी बघितली. सकाळी ९ वा. निघालेली सहल दु. १।। वा. शाळेत परत आली.

३) *आजी आजोबा दिवस* : गेली चार वर्षे हा दिवस आम्ही साजरा करत आहोत, दरवर्षी 'आजी आजोबा स्पेशल' म्हणूनच हा दिवस असतो. नातवंड आणि आजी आजोबा यांच्यातील रेशीमगाठ अजून घट्ट करण्यात छोटासा प्रयत्न आई वडील दोघेही नोकरी करणारे, मग मुलांच्या विकासाकडे आवर्जून लक्ष देणारे 'मोठे पालक' अर्थातच 'आजी आजोबा' सिनीयर के. जीच्या मुलांच्या आजी आजोबांकरता हा दिवस साजरा केला जातो. मुलांकडून त्यांना देण्यासाठी फोटो फ्रेम्स् करून घेण्यात आल्या होत्या. सौ. सुप्रिया जोशी व त्यांचे पती श्री. पुष्कराज जोशी यांच्या संवादिनी व तबला वादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन या निमित्ताने करण्यात आले होते; ज्याचा आस्वाद सर्वांनी मनमुराद लुटला. उपमा, नारळबर्फी व कॉफी असा अल्पोपहार सर्व उपस्थितांना देण्यात आला. १९ डिसेंबर रोजी सकाळी ९.३० वा. झालेल्या या कार्यक्रमाला १७० आजी आजोबांनी उपस्थिती नोंदवली.

४) *नाताळ* : २५ डिसेंबरला असणारा नाताळ २४ डिसें. रोजी शाळेत साजरा केला गेला. प्रवेशद्वाराजवळच 'येशू ख्रिस्ताचा जन्म कसा झाला' याबद्दलचा देखावा मांडला होता. चांदण्या, ख्रिसमसचे झाड यांनी आजूबाजूची सजावट करण्यात आली होती. माध्यमिक

विभागातील एक मुलगा सांताक्लॉज बनून आला होता. त्याने सर्व मुलांबरोबर गाणी म्हटली, नाच केला, तसेच मुलांना केकचा खाऊ वाटला.

५) *शाळेतच मुक्काम* : २३ जाने.च्या शनिवारी संध्याकाळी ७ वा. पासून ते २४ जाने. च्या सकाळी ८ वा. पर्यंत सीनियर के.जीच्या मुलांसाठी रात्र मुक्काम तसेच कॅम्पफायरचा कार्यक्रम ठरवला होता. २३ ता.ला संध्याकाळी ७ वा. छोट्या बॅगा घेऊन मुलं शाळेत आली. नंतर एकत्रितपणे त्यांचे खेळ, गाणी शिक्षकांनी घेतली. मुलांना पावभाजी व गुलाबजामचे जेवण देण्यात आले. डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या मैदानात कॅम्पफायरचा कार्यक्रम झाला. नंतर मुलांनी आपापल्या सवंगड्यांच्या मदतीने रात्रीचे कपडे घातले. दमलेली मुले शिक्षकांजवळ गाढ झोपी गेली. सकाळी उठून ब्रशने तोंड धूवून, दूध पिऊन रविवारी सकाळी ८ वा. मुले आपापल्या घरी गेली.

६) *वार्षिक स्नेहसंमेलन* : ३० जाने. रोजी संध्याकाळी ५ वा. स्नेहसंमेलन झाले. विद्यालंकार सभागृहासमोर पटांगणात आसनव्यवस्था होती. के. जी. विभागप्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी प्रास्ताविकाचे भाषण केले. नंतर सिनीयर के. जी. विभागाच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी, हिंदी, मराठी भाषांतून गाणी, नृत्य तसेच नाटुकली सादर केले. उपस्थितांनी मुलांच्या या कलागुणांचे भरभरून कौतुक केले.

७) *पालकांसाठी कार्यशाळा* : ६ फेब्रुवारी रोजी ज्यूनियर के. जी.च्या पालकांसाठी शाळेतर्फे 'विवेकनिष्ठ पालकत्व' या विषयावर डॉ. अजय ताम्हणे यांच्या कार्यशाळेचे करण्यात आले होते. मुलांना त्यांच्या मानसीक गरजा पूर्ण करणारे पालक व्हा, असा मोलाचा विचार डॉक्टरांनी मांडला. मुलांच्या समोर त्यांचे पालकच आदर्श असले पाहिजेत, मुलांना ज्या सवयी लावायच्या त्या आधी पालकांनी स्वत:ला लावून घेतल्या पाहिजेत असे डॉक्टर पुढे म्हणाले. त्यानंतर पालकांच्या अनेक समस्या डॉक्टरांनी मार्गदर्शन करून सोडवल्या ह्यांचा पालकांना नक्कीच फायदा होईल असे मत पालकांनी त्यांच्या पत्राद्वारे व्यक्त केले.

८) *वार्षिक प्रदर्शन* : मुलांनी केलेल्या अनेक कलाकृतींचं वार्षिक प्रदर्शन १२ फेब्रुवारी रोजी पार पडलं. के. जी च्या विद्यार्थ्यांना 'हसत खेळत शिक्षण' पद्धतीद्वारे शिकवले जाणारे अनेक प्रकल्प गणित व भाषेतील पाठ मुलांनी प्रात्यक्षिकासहित पालकांना दाखवले. एवढ्या लहान वयाची मुले अतिशय आत्मविश्वासाने बोलताना बघून पालकांना फार आनंद होत होता. प्रत्येक मुलासाठी टाळ्या वाजवून पालक त्याच अभिनंदन करत होते.

९) *बाजारहाट* : सिनियर के. जी.च्या मुलांनी बनवलेल्या विविध वस्तूंची विक्री या बाजारात केली जाते; ज्याद्वारे मुलांना 'खरेदी विक्रीची' संकल्पना समजते. यावर्षी १७ मार्च रोजी बाजारहाट आयोजित केला होता. सिनीयर के. जी. ची काही मुले दुकानदार म्हणून शिक्षकांसोबत होती, तर सिनीयरची इतर मुले व ज्युनीयरची सर्व मुले खरेदी करण्यासाठी आली होती.

१०) *मनोरंजनात्मक कार्यक्रम* : ज्यूनीयर के. जी.च्या मुलांनी त्यांचे पहिले वहिले सादरीकरण शाळेच्या छोट्याशा सभागृहात २० मार्च रोजी केले. या कार्यक्रमाच्या आधी विभागप्रमुख सौ. मेघना मुळगुंद यांनी प्रास्ताविक केले, ज्यात ह्या कार्यक्रमाचे स्वरूप लहान का ठेवले जाते हे पालकांना सांगितले. यानंतर मुलांनी श्लोक, गाणी व त्यावर नृत्यही सादर केले. सर्व उपस्थित पालकांनी मुलांचे खूप कौतुक केले.

११) *शिक्षकांसाठी कार्यशाळा* : आजकालच्या या अतिशय वेगाने बदलणाऱ्या युगात प्रत्येकाने स्वत:ला

नवनवीन गोष्टींची दखल घेऊन त्या शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे, यासाठी शिक्षकसुद्धा अपवाद असू नयेत, म्हणून नियमितपणे कार्यशाळेचे आयोजन केले जाते. आजच्या या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे येणारा ताण, वेळेचे प्रभावी नियोजन यावर मार्गदर्शन करण्यासाठी २१ फेब्रुवारी रोजी डॉ. अजय ताम्हाणे यांची १ दिवसाची कार्यशाळा आयोजित केली गेली.

एक प्रभावी शिक्षक, व्यक्ती होण्यासाठी कोणत्या गुणांची आवश्यकता आहे, ताणतणाव कमी होण्यासाठी काही गोष्टींचा कसा वापर करता येईल याबद्दल डॉक्टरांनी काही उपाय सांगितले. वेळेचे प्रभावी नियोजन जीवनाची वाटचाल सोपी करू शकते, याबद्दल त्यांनी अतिशय हलक्याफुलक्या शैलीत मार्गदर्शन केले.

सर्वच शिक्षक अशा कार्यक्रमांतून बरंच काही नवीन ज्ञान मिळवतात. अशा कार्यशाळांमधे भाग घेण्याची संधी आम्हाला मिळते, याबद्दल सर्व शिक्षकवर्ग वरिष्ठांचे मनापासून आभारी आहोत.

**सौ. प्रिती कुलकर्णी**
शिक्षिका, पूर्व प्राथमिक विभाग,
सौ. ए.के. जोशी इंग्लिश मिडीयम स्कूल

## सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्रजी माध्यम शाळा (माध्यमिक विभाग)

**२००९-२०१० च्या बालवीर राज्य पुरस्काराचा निकाल :**

१००% लागला. राज्य पुरस्कार मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे -

१. विस्मित कर्णिक २. सुमेध काकडे ३.कौशिक व्यवहारकर

४. अभिषेक जोशी ५. अमित सोनार ६. विनीत दर्भे

७. पराग पाटील ८. शार्दुल मालशे ९. ओजस मुळे

**होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा - प्रयोग परीक्षेचा निकाल :**

लेखी व प्रयोग परीक्षेत पास होऊन मुलाखतीसाठी निवड झालेले विद्यार्थी -

१) इ. ९ वी - कु. पुष्कर ओक

२) इ. ६ वी - कु. प्रणिल जोशी, कु. नेहा केळकर
कु. सिद्धी सांगलिकर, कु. सत्रा तक्ष

**कल्पकला सांस्कृतिक मंच आयोजित आंतरशालेय विविध स्पर्धेंचा निकाल :**

| क्र. | स्पर्धा | गट | विद्यार्थ्याचे नाव | निकाल (क्रमांक) |
|---|---|---|---|---|
| १ | चित्रकला | ५ ते ७ वी | रुचा रसाळ | ३ रा |
| | | ८ ते १०वी | स्मृति काजरेकर | २ रा |
| | | | अक्षता मोहारीर | २ रा |
| | | | सिद्धेश घाग | उत्तेजनार्थ |
| | | | शलाका करंगुटकर | उत्तेजनार्थ |
| २ | हस्ताक्षर | ५ ते ७ वी | जान्हवी पाटणकर | १ ला |
| | | | सोनाली गजमल | २ रा |
| | | | अपूर्वा पुराणिक | २ रा |
| | | | तेजल पाटणकर | ३ रा |
| | | ८ ते १०वी | हेतल पाघधार | १ ला |
| | | | तन्मयी धमाले | २ रा |
| | | | वैशणवी मोरे | २ रा |
| | | | प्रथमेश विचारे | ३ रा |
| | | | अक्षता मोहारीर | उत्तेजनार्थ |
| ३ | निबंध | ८ ते १०वी | मिहीर कुलकर्णी | २ रा |
| ४ | वक्तृत्व | ८ ते १०वी | अक्षता मोहारीर | १ ला |
| ५ | भेटकार्ड | ८ ते १०वी | वैशणवी मोरे | २ रा |
| ६ | ३८ स्पर्धक शाळांमध्ये आमच्या शाळेला द्वितीय | | | |

| | |
|---|---|
| | क्रमांक प्राप्त झाला असून कै. शारदाबाई चौधरी स्मरणार्थ ढाल मिळाली आहे. तर |
| ७ | विभागवार सर्व स्पर्धक शाळांमधून आमच्या शाळेला प्रथम क्रमांक मिळाला आहे. |

**चित्रकला, हस्तकला व विज्ञान प्रदर्शन :**

दरवर्षी प्रमाणे यंदाही शुक्रवार दि. १२ फेब्रुवारी रोजी शाळेत, कला व विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते. यात इ. ५ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांनी काढलेली सुंदर चित्रे तसेच वैविध्यपूर्ण वस्तू प्रदर्शनात मांडण्यात आल्या होत्या.

विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन बी. एन. बांदोडकर महाविद्यालयाच्या डॉ. पूनम कुर्वे यांच्या हस्ते झाले. त्यांनी प्रयोग व प्रकल्पांचे निरीक्षण करून खालीलप्रमाणे निकाल जाहीर केले व त्यानंतर प्रदर्शन सर्वांसाठी ९ ते १२ या कालावधीत खुले करण्यात आले.

| इ. | प्रदर्शनाचे नाव | सहभागी विद्यार्थी |
|---|---|---|
| ५ वी | Rocketing Away | सायली तवटे<br>जान्हवी पाटील<br>रीया पार्टे |
| | Surface Tension | अनय ताम्हाने<br>हर्षल वेलिंग<br>अद्वैत भट<br>निनाद मराठे |
| ६ वी | Maglev Train | अथर्व वैद्य<br>वेंकटेश चौधरी |
| ७ वी | Clap Switch | ऋत्विक छेडा<br>मयांक जैन |
| ८ वी | Sound requires medium to travel | अनघा करमरकर<br>स्नेहा प्रभूदेसाई |
| ९ वी | No Problem Car | अमित पाटणकर<br>प्रियज नाबर |

## जोशी - बेडेकर महाविद्यालय

**१ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०१० या कालावधीत महाविद्यालयात संपन्न झालेले कार्यक्रम :**

❖ दि. १४ व १५ जानेवारी रोजी तत्त्वज्ञान विभागातर्फे 'मानवी मेंदू, मन व संज्ञा प्रवाह' (Mind, Brain and Consciousness) या विषयावर आंतरराष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. महाविद्यालयाने आयोजित केलेले आंतरराष्ट्रीय स्तरावरील हे प्रथमच चर्चासत्र होय. मनोविज्ञानशास्त्र (Psychiatry), मनोकायाशास्त्र (Neurobiology) शरीरशास्त्र व तत्त्वज्ञान अशा अनेक ज्ञानशाखांना कवेत घेणारा हा विषय आहे. मनाचा ज्या विविध ज्ञानशाखा व उपशाखा विविधांगी वेध घेत आहेत; त्या सर्वांना एका छत्राखाली आणण्यासाठी व दार्शनिक मंथन करण्यासाठी या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचा हेतू साध्य करण्यासाठी अनेक आंतरराष्ट्रीय ख्यातीचे विचारवंत, थोर तत्त्वज्ञ तसेच जिज्ञासू शास्त्रज्ञ उपस्थित होते. प्रा. नॅन्सी अँडरसन, प्रा. जॉर्ज व्हॅलिअंट, प्रा. भुवन चंडेल, प्रा. बालसुब्रह्मण्यम इ. विद्वानांचा चर्चासत्रात सहभाग होता. जोशी-बेडेकर महाविद्यालय, मेन्साना मोनोग्राफ हे मानसिक आरोग्याला वाहिलेले नियतकालिक व भारतीय तत्त्वज्ञान संशोधन पीठ यांच्या संयुक्त विद्यमाने हे चर्चासत्र यशस्वीरीत्या संपन्न झाले. तत्त्वज्ञानविभागप्रमुख व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह व मेन्साना मोनोग्राफ या वार्षिकाचे संपादक डॉ. अजय सिंह हे दांपत्य चर्चासत्राचे प्रेरणास्थान होते. तत्त्वज्ञान विभागाच्या प्रा. (सौ.) सुचित्रा नाईक या चर्चासत्राच्या समन्वयक होत्या. दि. १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० ते ९.३० पर्यंत

चर्चासत्राची पूर्वपीठिका म्हणून काही खास व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. दि. १४ जाने. या दिवशीच्या चर्चासत्राची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमांनी झाली.

❖ दि. २१, २२, २३ जाने. रोजी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन विभागातर्फे 'क्रिसीलिस' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी क्रिकेट, फुटबॉल,कॅरम, प्रश्नमंजुषा, नृत्य इ. स्पर्धांचे तसेच मॅरॅथॉनचेही आयोजन करण्यात आले होते.

❖ दि. २८ व २९ जाने. रोजी आंतरमहाविद्यालयीत 'गंधर्व' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. एकंदर ३५ महाविद्यालयांनी यात सहभाग घेतला होता. वादविवाद, प्रश्नमञ्जुषा, रांगोळी, छायाचित्रण, चित्रकला, कॅरम, बुद्धिबळ, गीतगायन, गरबा, फॅशन शो इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे वैशिष्टय म्हणजे या वर्षी प्रथमच प्राध्यापकांसाठी गीतगायन व पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

❖ दि. ९ फेब्रुवारी रोजी 'Placement Cell' तर्फे T.C.S. व B.P.O. या कंपन्यांतर्फे तृतीय वर्षाच्या कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'Campus Interview' चे आयोजन करण्यात आले होते. एकंदर २५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

❖ दि. १० फेब्रुवारी रोजी हिंदी विभागातर्फे मधू भंडारी यांच्या पटकथेवर आधारित 'स्वामी' चित्रपट दाखविण्यात आला.

वृत्तसंकलन - **प्रा. डॉ. मुग्धा कुलकर्णी**
जोशी-बेडेकर महाविद्यालय

## व्ही.पी.एम. टी.एम्.सी. विधी महाविद्यालय

❖ वि.प्र. मंडळाच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे दि. १४ व १५ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या 'Mind, Brain and Consciousness' या विषयावरील चर्चासत्रात महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी Mens legan Connect infancy, insanity & law या विषयावर शोध प्रबंध सादर केला.

❖ के. एम. एफ. सोसायटीच्या जी. एम. मोमीन महिला महाविद्यालयाच्या दिनांक ३० व ३१ जानेवारी रोजी आयोजित केलेल्या आतंकवाद मानवी अधिकाराची विचारधारा - शांतता आणि न्याय या विषयावर आयोजित केलेल्या यु.जी.सी. राष्ट्रीय चर्चासत्रात प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी ''आतंकवाद : कायदेशीर दृष्टीकोनातून'', या विषयावर शोधप्रबंध सादर केला.

❖ दि. १० जाने. रोजी विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थांनी 'Model Indian Parliament session' मध्ये सहभाग नोंदविला. तसेच दि. १७ जानेवारी रोजी रोट्रक्ट क्लब ठाणे यांनी आयोजित केलेल्या 'Model United Nations Assembly' मध्ये सहभाग नोंदवून खालील पारितोषिक जिंकली.

१. मसुदा मांडणी सदरीकरण - श्री. आष्टेकर I-LL.B.

२. पोशाख - कु. निलाक्षरी सागवेकर II-LL.B.
श्री. बोरसकर III-LL.B.

**संविधान दिवस :**

❖ महाविद्यालयाने आयोजित केलेल्या दि. २७ जाने. च्या संविधान दिवस या कार्यक्रमात वरिष्ठ वकील श्री. राम आपटे यांनी ''राष्ट्रीय आणीबाणी व भारतीय संविधान'' या विषयावर मार्गदर्शन केले. संविधान दिवसाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या 'संविधानातील आवश्यक बदल' या विषयावरील निबंध स्पर्धेत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी भाग घेतला. सदर स्पर्धेत निलाक्षरी सागवेकर I LL.B., यतिन पंडीत II LL.B., चेतन

बारसकर II LL.B., पूजा ओक II LL.B. व श्रद्धा पोपट यांनी बक्षीस मिळविले. तसेच याच निमित्ताने आयोजित केलेल्या देशभक्तिपर गीते या स्पर्धेत आनंद कार्लेकर, दिनेश माळी, स्नेहल कुमार गायकवाड यांनी बक्षीस पटकावले.

❖ TISS, मुंबई यांनी ११ व १२ डिसेंबर रोजी आयोजित केलेला 'National Consultation on Criminal Justice Reforms' प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयकुमार यांनी सहभाग घेतला होता.

**कार्यशाळा :**

महाविद्यालयात दि. ३० जाने. रोजी 'वाहन अपघात दावे, कायदा आणि प्रात्यक्षिक' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

भावी वकिलांना वाहन अपघात दावे योग्य प्रकारे हाताळता येण्यासाठी लागणारे तंत्र त्यांना आत्मसात करता यावे हे या कार्यशाळेमागचे प्रमुख उद्दिष्ट होते. प्रस्तुत विषय मुंबई विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट नसल्याने या कार्यशाळेला विशेष महत्त्व होते.

कार्यशाळेचे उद्घाटन निवृत्त जिल्हा न्यायाधीश श्री. जे. के. दास यांच्या हस्ते झाले तर अध्यक्षस्थानी मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. श्री. वि. करंदीकर हे होते. ॲड. श्री. एस्. एम्. पायक (कार्यशाळा समन्वयक) ॲड. श्री. यशवंत दुदसकर, ॲड. श्री. एस्. व्ही. पुजारी आणि ॲड. श्री. संदिप शिंदे (माजी न्यायाधीश) कार्यशाळेतील प्रमुख वक्ते होते.

सर्व सहभागी विद्यार्थ्यांनी उत्साहाने कार्यशाळेत भाग घेतला आणि शेवटी सर्वोत्तम प्रश्नांना बक्षीस जाहीर केल्याने सर्व आश्चर्यचकित झाले. कार्य शाळेची सांगता प्राचार्या सौ. श्रीविद्या जयकुमार यांच्या आभार प्रदर्शनाने झाली.

**फिरते लोक न्यायालय :**

उच्च न्यायालयाच्या कायदा सेवा समितीने दि. १७ जाने. रोजी देशातील पहिले फिरते लोक न्यायालय फडके पाडा मुंब्रा येथे आयोजित केले होते. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या, अधिव्याख्याते आणि काही विद्यार्थी यासाठी उपस्थित होते. महाविद्यालयातील ॲड. श्री. परांजपे ॲड. श्री. पायक व ॲड. श्रीमती विद्या गायकवाड हे अधिव्याख्याते या लोक न्यायालयातील न्यायाधीशांच्या यादीत होते.

**वार्षिक क्रीडामहोत्सव :**

महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडामहोत्सव २२, २३ व २४ जाने. रोजी संपन्न झाला. त्याअंतर्गत आयोजिलेल्या धावणे, गोळाफेक क्रिकेट, कॅरम, बुद्धिबळ इ. क्रीडाप्रकारांमध्ये उत्साहाने भाग घेत विद्यार्थ्यांनी त्याचा आनंद लुटला.

**फोर्झा :**

महाविद्यालयाचा सांस्कृतिक आणि त्यांच्यातील विशेष कौशल्याचा शोध घेणारा महोत्सव 'फोर्झा' दि. २८ व २९ जाने. रोजी पार पडला हा कार्यक्रम पूर्णत: प्रथम वर्षात शिकणाऱ्या उत्साही विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने व जबाबदारीने पार पाडला.

**वक्तृत्व स्पर्धेत यश :**

द्वितीय वर्षाची विद्यार्थ्यीनी कु. निलाक्षी सागवेकर यांना दि. २६ जाने. रोजी आयोजित प्रतिष्ठेच्या नानी पालखीवाला वक्तृत्व स्पर्धेत ३५०० रु. रोख व पुस्तके असे तिसरे पारितोषिक मिळाले. महाविद्यालयातर्फे त्यांचे अभिनंदन!

**Results :**

November 2009

| | College | University |
|---|---|---|
| Sem I | 36.44% | 29% |
| Sem II | 44.70% | 29.22% |
| Sem III | 44.02% | 36.46% |

## तंत्रनिकेतन

**पॉली – स्पार्क २००९ चा वार्षिकोत्सव कार्यक्रम संपन्न अहवाल :**

हिवाळी परीक्षा संपली अन 'पॉली-स्पार्क' या वार्षिकोत्सव कार्यक्रमाची सुरूवात उत्साहात झाली. आपल्या नेहमीच्या रूटीन कामातून फारकत घेत सर्वच विद्यार्थी व कर्मचारी या कार्यक्रमात सहभागी झाले होते. या वर्षी 'पॉली-स्पार्क' २००९ ची सुरुवात २८ डिसेंबरला झाली व कार्यक्रमाचा शेवट ३१ डिसेंबर रोजी झाला.

या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश हा विद्यार्थ्यांच्या ठिकाणी असलेल्या बुद्धिमत्तेला व त्यांच्या अंगी असलेल्या विविध कलागुणांना वाव मिळावा यासाठी त्यांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न असतो. त्यासाठीच तंत्रनिकेतनच्या पॉली-स्पार्क विविध व आव्हानात्मक स्पर्धाचे आयोजन करण्यात येते.

सांस्कृतिक कमिटीची मिटिंग २२ डिसेंबर रोजी घेण्यात आली. मिटिंगमध्ये विविध कार्यक्रम व त्यांचे प्रमुखांची निवड करण्यात आली. सांस्कृतिक कार्यक्रमाचे जनरल सेक्रेटरी म्हणून SYCO मधील विद्यार्थी शुशान सुळे यांची निवड करण्यात आली व सह-सेक्रेटरी म्हणून SYCO मधील विद्यार्थिनी कु. प्रेरणा घाटमले हिची निवड करण्यात आली.

दि. २८ डिसेंबर रोजी कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. त्या दिवशी सकाळी 'Group Matching Day' व 'Chocolate day' चे आयोजन करण्यात आले. दुपारनंतर रांगोळी, मेहंदी व टी-शर्ट पेंटीग इ. स्पर्धा घेण्यात आल्या.

दि. २९ डिसेंबर रोजी 'Traditional Day' साजरा करण्यात आला. तसेच फिल्मी गाण्यांवर आधारित 'अंताक्षरी स्पर्धा' झाली. अंताक्षरी कार्यक्रमाला उपस्थितांचा चांगलाच प्रतिसाद लाभला.

दि. ३० डिसेंबर व ३१ डिसेंबर या दोन दिवशी महत्त्वाच्या स्पर्धा पार पडल्या. ३० डिसेंबरला सकाळी 'Danim day व Talent Hunt' या दोन स्पर्धा पार पडल्या. दुपारनंतर Fun-Fair चे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध खाद्य पदार्थांचे व खेळाचे स्टॉल्स लावले होते.

Mr. Poly-Spark आणि Miss Poly-Spark ची निवड Ticking आणि Saree Queen या स्पर्धेमधून करण्यात आली. त्यानंतर 'संगीत संध्या' हा संगीतावर आधारित गायनाची स्पर्धा पार पडली. वरील स्पर्धा ह्या सायन्स कॉलेजच्या शेजारील AMPI Theatre येथे पार पडल्या.

शेवटी विविध स्पर्धांत यशस्वी ठरलेल्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देवून गोरविण्यात आले.

सन २००९-१० चे वार्षिकोत्सव स्नेहसंमेलन हे प्रा. ऋचा कोऱ्हाळे यांच्या नेतृत्वाखाली व प्राचार्य दि. कृ. नायक याच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सांस्कृतिक समितीचे प्रमुख व विद्यार्थी प्रतिनिधी या सर्वाचे सहकार्य लाभले. या सर्वांचे प्रा. ऋुचा कोऱ्हाळे यांनी आभार मानले.

तंत्रनिकेतन वृत्त संकलन
**श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि.प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे

## काव्यस्मरण




*(१८ मार्च हा विश्वनाथ शेंड्ये यांच्या निधनानंतर येणारा त्यांचा पहिला जन्मदिवस. त्यांनी २००७ मध्ये केलेली एक कविता त्यांच्या स्मरणार्थ देत आहोत. जीवनाचे श्रेय इतरांना देणारा मनाचा मोठेपणा असणाऱ्या बंडोपंतांना मृत्यूची चाहूल लागली होती ... ? – संपादक)*

### आम्ही काय केलं ?

आम्ही जन्माला आलो
सारं काही आई वडिलांनी केल
आम्ही शाळेत गेलो
सारं काही शिक्षकांनी केलं
आम्ही कॉलेजात गेलो
सारं काही गुरुजनांनी केलं
आम्ही तरुण झालो
प्रेम केलं – सारं सहज झालं
आम्ही लग्न केलं
सारं काही मातापित्यांनी सासुसासऱ्यांनी केलं
आम्हाला मुलं बाळं झाली
निसर्ग नियमाने वाढत गेली
बघता बघता परदेशात गेली
त्यांचं सारं त्यांनीच जमवलं !
आता अंतकाळ जवळ आला
यमानं विचारलं तुम्ही काय केलं
उत्तर एकच आम्ही काहीच नाही केलं
सारं कसं आपसूक होत गेलं

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006



# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❖ अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा
- ❖ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❖ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❖ संपर्क ❖

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टर्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.